


## आफ्रिदी आशिया चषकातून बाहेर

**नवी दिल्ली :** आशिया चषक २०२२ क्रिकेट स्पर्धा तोंडावर येऊन ठेपलेली असताना पाकिस्तानला धक्का बसला आहे. पाकिस्तानचा प्रमुख गोलंदाज शाहीन आफ्रिदी दुखापतीमुळे आशिया चषकातून बाहेर पडला आहे. गाले येथे झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात क्षेत्ररक्षण करताना शाहीनच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली होती. नव्याने केलेल्या स्कॅन आणि वैद्यकीय तपासणी अहवालांच्या आधारे त्याला चार ते सहा आठवडे विश्रांतीचा सल्ला मिळाला आहे.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड






रविवार, दि. २१ ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३२२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# सत्ता बदलताच पुन्हा शिळ्या कढीला ऊत

## नाचू लागले सिंचन घोटाळ्याचे भूत

सुराज्य/सोलापूर

**सत्ता बदलली की संदर्भ बदलतात. संदर्भ बदलले की धोरण बदलते. धोरण बदलले की कार्यक्रम बदलतात. कार्यक्रम बदलला की काल-परवापर्यंत जे चुकीचे होते ते बरोबर दिसू लागते आणि जे बरोबर होते ते चुकीचे ठरू लागते. याचाच प्रत्यय सध्या महाराष्ट्रात येतो आहे. जेव्हा राज्यात आघाडीचे सरकार होते; तेव्हा भाजपवाल्यांकडे सिंचन घोटाळ्याचे गाडीभर पुरावे होते. फडणवीस सरकार आल्यानंतर त्या पुराव्यांचे काहीच झाले नाही. पण पहाटेचा शपथविधी झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या ८० तासांतील सरकारने अजित पवारांना क्लिनचिट दिली. आता पुन्हा सत्ता बदल झाला आहे आणि आता पुन्हा शिळ्या कढीला ऊत आला आहे. कारण पुन्हा एकदा सिंचन घोटाळ्याचे भूत महाराष्ट्रात नाचू लागले आहे.**

सिंचन घोटाळ्याची चर्चा महाराष्ट्राला काही नवीन नाही. राज्यात आघाडी सरकार होते. त्यावेळी भाजप विरोधी बाकावर होते. म्हणजे सन २०१२ मध्ये सिंचन घोटाळ्याचा मुद्दा पुढे आला. त्यावेळी सिंचन घोटाळ्याचे बैलगाडी भरून पुरावे असल्याचे भाजपकडून सांगितले गेले. पुढे आघाडीची सत्ता गेली आणि युतीची सत्ता आली. त्या बैलगाडी भरून पुराव्याचे काय झाले कळले नाही. त्यानंतर जेव्हा फडणवीस आणि पवार यांचा पहाटेचा शपथविधी झाला; त्यावेळी सिंचन घोटाळ्यात अजित पवारांना क्लिनचिट मिळाली. पुढे जाऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन महासंचालक परमवीर सिंग यांनी सिंचन घोटाळ्यात अजित पवारांचा संबंध नसल्याचे शपथपत्र न्यायालयात सादर केले. आता पुन्हा राज्यात सत्ता बदल होताच तोच सिंचन घोटाळा आणि पुन्हा त्याच अजित पवारांवर आरोप सुरू झाल्याने पुन्हा एकदा नव्याने चर्चा सुरू झाली आहे.



### नाही सापडला बडा मासा, आता सापडणार कसा?

विरोधात असताना गाडीभर पुरावे असल्याचे सांगणारा भाजप जेव्हा सत्तेत आला तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सिंचन घोटाळ्याचा तपास दिला. तपास पथकाने अनेक फायलींमधील कागद अन् कागद तपासला. त्यात अजित पवार किंवा अन्य कोणताच बडा मासा सापडला नाही. तसे प्रतिज्ञापत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने न्यायालयात सादर केले. आता सत्ता बदल झाल्यानंतर पुन्हा तोच कित्ता गिरवला जात आहे. तेव्हा बडा मासा सापडला नाही तर आता कसा सापडेल? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



### श्वेतपत्रिका... काळीपत्रिका...सत्यपत्रिका...

सन २०१२ मध्ये सिंचन घोटाळ्याचा मुद्दा सभागृहात गाजल्यानंतर त्यात पहिल्यांदा तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव आले. त्यावेळी सरकारने श्वेतपत्रिका जारी केली. त्यास प्रत्युत्तर म्हणून भाजपने काळी पत्रिका जारी केली. तिसरीकडे वैधानिक मंडळाचे तत्कालीन तज्ज्ञ सदस्य अ‍ॅड. मधुकरराव किंमतकर यांनी सत्यपत्रिका जारी केली. त्यातूनच तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी जलतज्ज्ञ माधव चितळे यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन केली.

### १७ प्रकल्प, ३०२ निविदा, २८ गुन्हे

सिंचन घोटाळ्याचा नागपूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तपास केला. त्यात एकूण १७ प्रकल्पातील ३०२ निविदांचा तपास करून एकूण २८ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये ३५ ते ४० अधिकारी व कंत्राटदारांना आरोपी करण्यात आले. यामध्ये कार्यकारी संचालक, अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते व इतर अधिकारी आरोपी झाले. याचवेळी या घोटाळ्यात विद्यमान विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे नाव चर्चेत आले.

## विष प्राशन केलेल्या पंढरपुरातील तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** घरगुती भांडणातून रागाच्या भरात विष प्राशन केलेला बाळू काकासाहेब पवार( वय२८ रा.पंढरपूर) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना आज शनिवारी दुपारी मरण पावला.

तो १० ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास घरात विष प्यायला होता. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## भारतीय संघाला मालिकेत विजयी आघाडी

### दुसऱ्या वनडेत झिम्बाब्वेवर ५ गडी राखून विजय

**हरारे :** भारत आणि झिम्बाब्वेदरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना हरारे स्पोर्ट्स क्लब' क्रिकेट मैदानावर झाला. या सामन्यात भारताने यजमान संघावर पाच गडी राखून विजय मिळवला. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताला २-० अशी विजयी आघाडी मिळाली आहे. पहिल्यांदा फलंदाजी करून यजमान संघाने ३८.१ षटकांमध्ये सर्वबाद १६१ धावा



केल्या होत्या. झिम्बाब्वेने विजयासाठी दिलेले १६२ धावांचे लक्ष्य भारतीय संघाने पाच गडी गमावून २५.५ षटकांमध्ये पार केले. शिखर धवन आणि शुबमन गिल यांनी दुसऱ्या गड्यासाठी २९ चेंडूत ४२ धावांची भागीदारी केली.

## दहीहंडी फोडताना तिघेजण जखमी

सुराज्य/सोलापूर

शहर परिसरात दहींहडी फोडताना उंचावरून खाली पडल्याने १३ वर्षाच्या मुलासह तिघेजण जखमी झाल्याची नोंद शहर पोलिसात झाली आहे. सरस्वती चौकात दहींहडी फोडताना नागेश सिद्राम चन्नापागुल (वय १३ रा. लष्कर) हा मुलगा जखमी झाला. शुक्रवारी दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला. सदरबझार पोलिसात झाली. दुसरी घटना विजापूर नाका परिसरातील आम्रपाली चौकात घडली. अक्षय राजेंद्र मडगमकर (वय २५ रा. सोनियानगर, विजापूर रोड) असे जखमींचे नाव आहे.

तो शुक्रवारी रात्री दहींहडी फोडताना जखमी झाला. याची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. तर तिसरी घटना मोदी परिसरातील चिंतलवार वस्तीत रात्रीच्या सुमारास घडली. अभिजीत सुरेश साबळे (वय २२) हा तरुण जखमी झाला. याची नोंद सदर बझार पोलिसात झाली. जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे .

■ कॉ.गोविंद पानसरे हत्या प्रकरण

## तपासाचा प्रगती अहवाल सादर करण्याचा कोर्टाचा एटीएसला आदेश

**मुंबई :** ज्येष्ठ विचारवंत कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाची सूत्रे नुकतीच हाती घेतलेल्या राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाला (एटीएस) प्रकरणाच्या तपासाचा प्रगती अहवाल सहा आठवड्यांत सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने शनिवारी दिले.



काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने प्रकरणाचा तपास राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) काढून एटीएसकडे वर्ग केला होता. पानसरे यांच्या हत्येच्या तपासात २०१५ पासून म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. प्रयत्न करूनही पानसरे यांची हत्या करणाऱ्यांचा शोध घेण्यात एसआयटीला यश आलेले नाही, अशी टिप्पणी करून न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठाने प्रकरणाचा तपास एटीएसकडे वर्ग केला होता तसेच एटीएसचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विनीत अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाचा तपास करण्याचे आणि एसआयटीच्या काही अधिकाऱ्यांचा तपास पथकात समावेश करण्याचा आदेशही न्यायालयाने दिला होता. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रकरणाच्या तपासासाठी अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली १३ जणांचे तपास पथक नियुक्त करण्यात आल्याचे आणि त्यात एसआयटीच्या तीन अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आल्याची माहिती विशेष सरकारी वकील अशोक मुंदरगी यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयाने त्यांचे हे म्हणणे नोंदवून घेत प्रकरणाची सुनावणी सहा आठवड्यांनी ठेवली. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी तपासाच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्याचे आदेश एटीएसच्या विशेष तपास पथकाला दिले.

## भोगाव येथील तेलाच्या कारखान्यात चोरी

**सोलापूर :** भोगाव (ता.उत्तर सोलापूर) येथील नालंदा आश्रम शाळेसमोर असलेल्या खाद्य तेल पॅकींग कारखान्याचे शटर उचकटून चौघा चोरट्यांनी ४१ हजार रुपये किमतीचे खाद्यतेलाचे डबे पळविले. ही चोरी काल शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. वॉचमनने आरडाओरड केल्यानंतर चोरटे कांही डबे रस्त्यावर टाकून पसार झाले. मात्र चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

भोगाव येथे श्रीकांत बसवेश्वर मंगरूळे (रा. भवानीपेठ) यांचे खाद्यतेल पॅकिंगचे युनिट आहे. पहाटे तीनच्या सुमारास चोरटे युनिटचे दोन शटर उचकटून १५ लिटर खाद्य तेलाचे डबे पळवत होते. त्याच्या आवाजाने वॉचमनला जाग आली. त्याने आरडाओरड केल्यावर चोरटे १३ डबे घेऊन पसार झाले. याची नोंद तालुका पोलिसात झाली. कॅमेऱ्यात कैद झालेल्या चोरट्यांचा फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हवालदार कोळेकर तपास करीत आहेत.

## राष्ट्रवादी युवा आघाडीच्या ३० पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

▸ शिंदे गटात करणार प्रवेश

**सोलापूर :** राज्यातून राष्ट्रवादीची कॉँग्रेसची सत्ता गेल्यानंतर सोलापुरात राजकीय घडामोडी घडत आहेत. एमआयएमच्या सहा नगरसेवकांचे इन कमिंग झाल्यानंतर स्थानिक पदाधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त करत युवक आघाडीतील ३० पदाधिकाऱ्यांनी आपल्या सदस्यत्व पदाचे राजीनामे शहराचे अध्यक्ष भारत जाधव यांच्याकडे दिले आहेत. ते एकनाथ शिंदे गटात पुण्यामध्ये मंत्री तानाजी सावंत यांच्या उपस्थित प्रवेश करणार आहेत.

राष्ट्रवादी कॉँग्रेसचे रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे शहर यांच्यासह इतर तीस



पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले असल्याचे शनिवारी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले.

यावेळी शिंदे गटाचे मनीष काळजे उपस्थित होते. माजी नगरसेवक मनोज शेजवाल, मनिष काळजे यांच्या मार्गदर्शना खाली यापुढे काम करणार असल्याचे जाहीर केले. शिवराज विभुते,अजिंक्य शिंदे, यशू मडरी, किशोर चव्हाण, बंटी बोराडे, पद्मसिंह शिंदे, आशिष जेटीथोर सुहास तोरवी, प्रतिम चव्हाण, सौरभ कांबळे,सोनू कांबळे, मल्ली कोळी गोपाल कांबळे, गोपाळ होटकर श्रेयस माने अक्षय बुरगे, सुरज नारायकरम सौरभ झगडे, संकेत यादव अनमोल उफळे, अजित पवार, अविनाश म्हेत्रे सोहेल शेख, आकाश रामपुरे, अमर कडले यांचा राजीनामा देण्यामध्ये समावेश आहे.

### फक्त आंदोलनासाठी वापर केल्याचा आरोप

पक्षातील पदाधिकाऱ्यांनी सत्ता नसताना आंदोलनासाठी वापर करून घेतला मात्र सत्ता आल्यानंतर युवकांना डावलण्यात आले. त्यामुळे नाराज होऊन राजीनामे दिल्याचे सर्वांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अर्धे माझं आहे!
माझे पण आहे!


कल्याण
367-67-340


## कचरा गोळा करणारी महिला निघाली अट्टल चोर

■ गुन्हे शाखने केले जेरबंद; दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर

कचरा गोळा करणारी महिलेस शहर गुन्हे शाखेने तिला जेरबंद केले असून तिच्याकडून चार घरफोडीतील दहा लाख ६१ हजार रुपयांचे दागिने जप्त केले आहेत. विशेष म्हणजे मुंबईतील कुर्ल्याला राहणारी जयश्री कन्वर उपाध्याय ही महिला वाणी प्रताप काळे या नावाने सोलापुरात वावरात होती. कचरा गोळा करण्याच्या बहाण्याने ती घरात कोणी नसल्याचा अंदाज घ्यायची आणि त्याठिकाणी चोरी करून पसार होत होती. तिच्यावर विविध ठिकाणी २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत.

शहरात मागील काही दिवसांपासून दिवसा घरफोडीचे प्रमाण वाढले आहे. त्याअनुषंगाने चोरी झालेल्या परिसरातून पोलिसांनी सीसीटीव्हीचे फुटेज संकलित केले. तसेच घरफोडीच्या पद्धतीवरून रेकॉर्डवरील चोरट्यांवरही पोलिसांनी वॉच ठेवला.त्यावेळी विजापूर नाका



व एमआयडीसी परिसरातील चार ठिकाणी घरफोडी झालेल्या घराजवळ एक महिला कचरा गोळा करीत असल्याचे साम्य पोलिसांना आढळून आले.पोलिसांनी त्या महिलेचा शोध सुरू केला .गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर यांनी त्यांच्या पथकासह कलबुर्गी व मुंबईतील कुर्ला याठिकाणाहून त्या महिलेबद्दल अधिक माहिती संकलित केली. त्यावेळी धक्कादायक बाब समोर आली. पोलिसांनी तिला १३ ऑगस्ट रोजी जेरबंद केले आणि चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई

### 'त्या' महिलेवर २० गुन्हे दाखल

कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्र, अशा चार राज्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये जयश्री उपाध्याय या महिलेविरूध्द घरफोडीचे तब्बल २० गुन्हे दाखल असल्याची माहिती उघड झाली.

सहायक पोलीस निरीक्षक क्षीरसागर व संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली महेश शिंदे, राजू मुदगल, कृष्णात कोळी, कुमार शेळके, निलोफर तांबोळी, ज्योती लंगोटे, रत्ना सोनवणे, विजय वाळके, अमित रावडे, सचिन होटकर, गणेश शिंदे, श्रीकांत पवार, राहुल तोगे, बाळु काळे, वसिम शेख, प्रकाश गायकवाड, सतिश काटे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, दिलीप किर्दक यांच्या पथकाने पार पार पाडली.

## दहीहंडीच्या कारणावरून मारहाण

सुराज्य/सोलापूर

दहीहंडीच्या कार्यक्रमास आम्हाला बोलावले नाही. या कारणावरून दगड आणि हाताने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक २ येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. सिद्धार्थ मदन मडीखांबे (वय २०) आणि लक्ष्मण अशोक गायकवाड (वय २३ दोघे रा.विजापूर नाका झोपडपट्टी) अशी जखमींचे नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रात्री ९ वाजेच्या सुमारास त्यांना अक्षय मडगमकर आणि अन्य दोघांनी मारहाण केली अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

# अप्पा-अण्णा यांच्यामुळेच सर्व संस्था टिकून

## धर्मराज काडादी यांचे प्रतिपादन; सिध्दसंग प्रतिष्ठानतर्फे सॅनिटरी पॅड मशीन भेट

✔ सुराज्य/सोलापूर

'सहकारमहर्षी वि. गु. शिवदारे अण्णा व कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांनी एक वेगळा दृष्टिकोन ठेवून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सहकार व आर्थिक संस्था उभ्या केल्या. त्या दोघांनीही अतिशय काटकसरीने या संस्थांचा कारभार पाहिला म्हणून आजही त्या संस्था टिकून आहेत', असे प्रतिपादन सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केले.




कै. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान आयोजित कै. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान स्मृती समारोह सप्ताहांतर्गत सिध्दसंग प्रतिष्ठानतर्फे सिध्देश्वर वुमेन्स इंजिनिअरिंग कॉलेज येथे सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन भेट देण्याच्या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मंचावर स्वामी समर्थ सूतगिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, सिध्दसंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश वाले, देवस्थानचे पंच ॲड. आर. एस. पाटील, भीमाशंकर पटणे, नरेंद्र गंभीरे, सी. बी. नाडगौडा, प्राचार्य गजानन धरणे, प्राचार्य डॉ. तुकाराम चव्हाण उपस्थित होते.

यावेळी शिवदारे म्हणाले की, 'कै. अप्पा व अण्णा यांनी त्या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने शैक्षणिक संस्था काढल्या. शिक्षणाबरोबरच इतरही क्षेत्रात त्यांनी अनमोल अशी कामगिरी केली. त्यांचे कार्य पुढे नेण्याची जबाबदारी माझी व धर्मराज काडादी यांची आहे.'

याप्रसंगी प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. सिध्देश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, मल्लिनाथ विभूते, तुकाराम काळे, पशुपती माशाळ, चंद्रकांत रमणशेट्टी, नागनाथ जावळे, ॲड. डी. जी. चिवरी, संगमेश्वर रघोजी, बाळासाहेब मुस्तारे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन महिला सक्षमीकरण विभाग प्रमुख पूजा बिराजदार-शिंगशेट्टी यांनी केले. अमृता निंबर्गी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. तुकाराम चव्हाण यांनी केले.

या प्रसंगी राजशेखर बुरकुले यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी दशरथ माने, सुभाष काबरा, रमेश सट्टे, मिलिंद लिगाडे, बसवराज कोरवार, प्रा. संजीव जमगे, प्रभुलिंग गोटे यांनी परिश्रम घेतले.



## बॉलबॅडमिंटन स्पर्धेत स.हि. ने. प्रशालेचे यश

✔ सुराज्य/सोलापूर : शिवदारे प्रतिष्ठानतर्फे आयोजित बॉलबॅडमिंटन स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात स. हि. ने. प्रशालेच्या खेळाडूंनी दुसरा क्रमांक पटकावीत घवघवीत यश मिळविले. प्रशालेने उपउपांत्य फेरीत जैन गुरुकुल प्रशालेचा १५-१०, १५-९ असा पराभव करीत उपांत्यफेरी गाठली. उपांत्यफेरीत श्राविका प्रशालेचा १५-११ १५-१० असा पराभव करीत अंतिमफेरी गाठली. अंतिम फेरीत सहीने प्रशालेच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावला. या संघातील खेळाडू यश भोसले, अमित पाडवी, सागर जाधव, सिध्दार्थ तुपेरे, नागराज चारहजारी यांनी उत्कृष्ट कामगिरी केले. क्रीडाशिक्षक वीरेश अंगडी, सहशिक्षिका विद्या माने यांचे मार्गदर्शन लाभले. श्री सरस्वती संस्थेचे अध्यक्ष शिरीष तुळजापूरकर, ज्येष्ठ सदस्य मोहन दाते, ॲड. रघुनाथ दामले, ॲड. पांडुरंग देशमुख, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षिका शीला देव यांनी अभिनंदन केले.

# मंगळवेढा तालुक्यासाठी ५० कोटींचा निधी मंजूर

✔ सुराज्य/पंढरपूर

महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर नवीन सरकारच्या पहिल्याच अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आमदार समाधान अवताडे यांनी मागणी केलेल्या मंगळवेढा तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ५० कोटींचा निधी मंजूर झाला आहे. राज्यात मविआ सरकार कोसळल्यानंतर पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाला चांगले दिवस आले आहेत. गेल्या महिन्याभरात जवळपास ७५ कोटी रुपयांची विकास कामांना मंजुरी मिळाली असल्याची माहिती आमदार समाधान अवताडे यांनी दिली.



आमदार समाधान अवताडे यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रातील रस्ते अतिशय खराब झालेले असून रस्त्याच्या पृष्ठभागामध्ये मोठे खड्डे पडले असल्याने वाहतुकीची मोठी गैरसोय होत असल्याच्या अनुषंगाने रस्ते रुंदीकरण व सुधारणा करण्यासाठी पुरवणी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करावी, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. आमदार समाधान अवताडे यांच्या या मागणीला मोठे यश मिळाले सदर रस्त्यांसाठी एकूण ५० कोटी ५ लाख इतका निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात मंगळवेढा तालुक्यातील रस्ते चकाचक होणार आहेत. नवीन सरकार स्थापनेनंतर नव्या विकास विमुख शासनाने पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाला भरघोस निधी पुरवणी मागण्याच्या मार्फत दिला आहे. यातील मंगळवेढा तालुक्यात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. याबद्दल आमदारांनी समाधान व्यक्त केले.

५०-५४ च्या शीर्षकाखाली जर रस्त्याची दर्जोन्नती झाली नसेल तर हे काम सदर शीर्षकाखाली घेता येत नाही, या करताच रस्त्यांची दर्जोन्नती होणे आवश्यक असते, पण मागील अनेक वर्षांपासून सदरचा दर्जोन्नतीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. याकरिता मी स्वतः उपमुख्यमंत्री यांना रस्त्याची दर्जोन्नती त्वरित होणेकरिता विनंती केली आहे. पंढरपूर आणि मंगळवेढा शहर आणि ग्रामीण भागातील नागरी सुविधांसाठी, ग्रामीण भागातील पाणंद रस्त्यांसाठी, पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून कोट्यवधींचा निधी सत्तांतरानंतर अवताडे यांनी मतदारसंघात आणला आहे.

# अमृतमहोत्सवानिमित्त लोकविकासतर्फे वृक्षारोपण

✔ सुराज्य/वेळापूर

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकविकास ज्युनिअर कॉलेज वेळापूर यांच्यावतीने लोकविकास शिक्षण संस्था व शंकर आश्रम (माने मळा) वेळापूर येथे श्रमदान व वृक्षारोपण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लोकविकासमधील क्रॉप सायन्समधील विद्यार्थी व कॉमर्समधील विद्यार्थी यांचा सहभाग होता.



विद्यार्थांनी आश्रमातील संपूर्ण परिसर स्वच्छ करून झाडांना कट्टे बांधून घेतले. आश्रमातील सेवक नागेश मिसाळ, तानाजी राजे घाडगे, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. कल्याण चोरमले, आनंद वाघे, रामभाऊ आडत, विकास माने, विष्णू माने, संतोष सागर, सिध्दी सागर यांच्यावतीने विद्यार्थांना भोजनाची सोय करण्यात आली.

या शिबीरात कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक अजित बनकर, सचिन साळुंखे, अमोल साठे, विजया चापले तसेच विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## कब्रस्तानलगतच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर : रंगभवन येथील जुना मुस्लीम कब्रस्तानच्या रखवालदारांनी टी. पी. रस्त्यावर अँगल मारून सदर रस्ता बंद केला आहे. त्यामुळे येथील रहिवाश्यांची हाल होत आहे. याची त्वरीत दखल घेऊन अतिक्रमण काढून महानगरपालिकेने संबंधितांवर गुन्हे दाखल करावे, अशी मागणी म. प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे सरचिटणीस रूस्तुम कंपली यांनी पत्रकार परिषदेत केली.

रंगभवन जवळ २०० वर्षापूर्वीचे मुस्लीम कब्रस्तान आहे. कब्रस्तानच्या दक्षिणेकडील फर्स्ट चर्चसमोर ते शितलादेवी मंदिरापर्यंत टी. पी. मंजूर रस्ता आहे. हा रस्ता बंद केल्याने नागरिकांची जा-

## मनी भाव असेल तर भगवंत करतो प्रार्थनेचा स्वीकार : चितळे

✔ सुराज्य/पंढरपूर

'भगवंताला शरण जाताना भक्ताच्या मनात देवाविषयीचा भाव असावा. मनात भाव असेल तर परमात्मा भक्ताच्या प्रार्थनेचा स्वीकार करतो', असे प्रतिपादन ह.भ.प. मोहना चितळे (पुणे) यांनी केले.

श्रीमद् भागवताचे उपासक नारायण कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कुलकर्णी परिवारातर्फे गोविंदश्री मंगल कार्यालयात आयोजित श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञात शेवटच्या दिवशी त्यांनी निरूपण केले.

प्रारंभी भगवान श्रीकृष्णांच्या प्रतिमेचे पूजन ह.भ.प. मोहना चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीकांत कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

# स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था

राजीव गांधी यांच्या १९८५ ते १९९० या पाच वर्षांच्या कारकिर्दीत सातवी योजना योजना पूर्ण झाली. त्या दरम्यान आर्थिक प्रगतीचा प्रतीवर्षी दर ५.६ टक्के होता. त्यांनी माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात अक्षरश: क्रांती करून भारताला खऱ्या अर्थाने २१व्या शतकात आणले. त्यासाठी देश त्यांचा सदैव ऋणी राहील. त्याचप्रमाणे ७३ व ७४वी घटनादुरुस्ती करून त्यांनी देशात पंचायती राज संस्थांचे जाळे निर्माण केले. या संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के जागा आरक्षित करून त्यांचे राजकीय सक्षमीकरण केले.



त्यानंतर १९९१मधील अतिशय गंभीर आर्थिक पेचप्रसंगामुळे देशात खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे पर्व सुरू झाले. इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत 'लायसन्स-परमिट-कोटा राज'मुळे औद्योगिकीकरणाचा वेग खूपच मंदावला होता. मक्तेदारी कायद्यामुळे उद्योगांच्या अधिक क्षमता वाढवण्यावर मर्यादा आली होती. निर्यात वाढण्याचे कोणतेही सशक्त प्रयत्न झाले नव्हते. आयात मात्र वाढत गेली. त्यामुळे परदेशी व्यापारातील तूट सतत वाढत जाऊन चालू खात्यावरील तूटही वाढली. 'अधिक निर्बंध म्हणजे अधिक समाजवाद' असे चुकीचे समीकरण तयार झाले. राजकीय मंडळी, उद्योगपती व प्रशासकीय अधिकारी यांच्यातील अभद्र युतीमुळे देशात एक भ्रष्ट व्यवस्था उभी राहिली. अर्थात ती आजही बलवान आहेच. अशा गंभीर पेचप्रसंगातून मार्ग काढून देशाची अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण, 'लायसन्स-परमिट-कोटा' रद्द करणे, परकीय भांडवल व तंत्रज्ञान यांच्यासाठी भारताची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, निर्यातीला चालना देणे, थेट परकीय भांडवल गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि भारताची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडणे अशा अनेक मूलभूत आर्थिक सुधारणा केल्या. या सर्वच सुधारणांचे सरसकट समर्थन करता येणार नाही. यापैकी काही पूर्वीच करायला हव्या होत्या; तर काहीचे अतिशय दूरगामी अनिष्ट परिणाम झाले आहेत. त्याची अधिक चर्चा इथे शक्य नाही. या काळात आठवी व नववी योजना पूर्ण झाली आणि आर्थिक सुधारणांमुळे आर्थिक प्रगतीचा दर वाढला. १९९२-९३ ते २००३-०४ पर्यंत (म्हणजे अटलबिहारी वाजपेयी यांचा कार्यकाल धरून) प्रतिवर्षी सुमारे सहा टक्के होता. याच काळात राष्ट्रीय उत्पन्न १५ लाख ८६ कोटी रुपयांवरून ३३० लाख कोटी रुपयांवर गेले.

२००४ व २००९ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होऊन डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान झाले. त्यादरम्यान दहाव्या योजनेची तीन वर्षे, अकरावी योजना व बाराव्या योजनेची दोन वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत खासगी सुधारणा अधिक व्यापक झाल्या. त्यामुळे आर्थिक प्रगतीचा दर साधारण साडेसात टक्के राहिला. २००४-०५ ते २००८-०९ अशी पाच वर्षे मला योजना आयोगाचा सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. अकरावी योजना तयार करताना पूर्वीच्या १०-१५ वर्षांतील आर्थिक प्रगती सर्वसमावेशक झाली नाही हे स्पष्ट झाले. दारिद्र्याची व्याप्ती व तीव्रता निखालसपणे मोठ्या प्रमाणावर कमी झाली, तरी फार मोठा समूह प्रगतीच्या फायद्यापासून वंचित राहिला. त्यामुळे काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी, पंतप्रधान आणि योजना आयोग यांच्या विचार मंथनातून अकराव्या योजनेत 'हक्काधिष्ठित प्रगती' हे सूत्र ठरवण्यात आले. त्यामुळेच १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत अधिकार, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हक्क योजना, माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा इ. कायदे संमत करून त्यांची अंमलबजावणी करण्यात. अकराव्या योजनेत एकूण आर्थिक तरतुदींपैकी ३० टक्के निधी शिक्षण व आरोग्यावर खर्च करण्यात आला. येथे सर्व महत्त्वाच्या योजनांचा नुसता उल्लेखही करणे शक्य नाही.

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार स्थापन झाल्यावर त्या पक्षाच्या प्रथमपासूनच्या अजेंड्याप्रमाणे झपाट्याने खासगीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यामुळे मोदी सरकारने सुरुवातीलाच योजना आयोग 'बरखास्त' करण्याचा फार अयोग्य व चुकीचा निर्णय घेतला. नोटबंदी व 'जीएसटी'च्या चुकीच्या अंमलबजावणीमुळे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला. गेल्या आठ वर्षांत मोठ्या चढ-उतारांसहित आर्थिक प्रगतीचा दर जेमतेम सहा टक्के राहिला. २०१३-१४ शी तुलना करता राष्ट्रीय उत्पन्न ९६ लाख कोटी म्हणजे दीडपटीने वाढले.

१९५०पासून गेल्या ६२ वर्षांतील भारतीय अर्थव्यवस्थेचा हा ढोबळ परामर्श आहे. त्यामुळे आता जागेअभावी अगदी त्रोटकपणे निष्कर्ष सांगणे आवश्यक आहे. एक, काँग्रेसच्या सुमारे ५६ वर्षांच्या कारकिर्दीत देशात अंधारयुग होते, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दावा हास्यास्पद आहे. दोन, २०१४ पर्यंत नियोजनबद्ध अर्थव्यवस्था असूनही आर्थिक प्रगतीचे फायदे वंचित घटकांपर्यंत नीटपणे पोचले नाहीत. तीन, १९९१ नंतरच्या खासगीकरणाचा परिणाम म्हणून एकूणच शिक्षण व आरोग्य सेवा अगदी माध्यम वर्गीयांच्यासुद्धा आवाक्याबाहेर गेल्या आहेत. त्यांचे बाजारीकरण सुरू झाले आहे. चार, बेरोजगारीची-त्यातही सुशिक्षित बेरोजगारीची समस्या अधिक उग्र झाली आहे. पाच, आर्थिक विषमता प्रचंड वेगाने वाढत आहे. सहा, योजना आयोग बरखास्त केल्यामुळे सरकारच्या आर्थिक प्रगतीचे मूल्यमापन करणारी यंत्रणा उपलब्ध नाही. त्यादृष्टीने नीती आयोग अर्थशून्य आहे. सात, मोदी सरकारला महागाई, बेरोजगारी इ. प्रश्नांवर त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करण्याची कधीच गरज वाटत नाही. इतकेच नव्हे; तर सरकारच्या कोणत्याही भूमिकेवर टीकात्मक मत नोंदवणे हा राष्ट्रद्रोह समजला जातो. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना हे चित्र चिंताग्रस्त करणारे आहे.

(उत्तरार्ध) - भालचंद्र मुणगेकर.




## दि. २१ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२२




कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि तुम्हांला आकर्षक प्रकल्प देखील मिळू शकतो. आर्थिक बाबतीत वेळ अनुकूल आहे. आठवड्याच्या सुरुवातीला कोणत्याही गुंतवणुकीबद्दल मन थोडेसे घाबरेल, पण शेवटी ती गुंतवणूक तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. तुमच्या सुंदर भविष्यासाठी काही ठोस निर्णय देखील घेऊ शकता. कुटुंबात एखादी चांगली बातमी मिळू शकते. या आठवड्यात प्रवास टाळलात तर बरे होईल. आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो आणि स्त्रीच्या आरोग्याबाबत मन उदास होऊ शकते. आठवड्याच्या अखेरीस जीवनात आनंद दार ठोठावेल.

**शुभ दिवस : २०, २१, २२, २४, २६**




या आठवड्यात तुम्हांला तुमच्या कुटुंबाकडून पूर्ण सहकार्य मिळेल आणि जीवनात आनंदी राहाल. या आठवड्यापासून आरोग्यातही चांगली सुधारणा दिसून येईल. कार्यक्षेत्रात तुम्ही केलेल्या मेहनतीचे शुभ परिणाम मिळतील, परंतु या आठवड्यात अधिक मेहनत घ्यावी लागेल. खर्च जास्त होऊ शकतो. प्रवासात चढ-उतार होतील आणि तुम्ही या आठवड्यात प्रवास पुढे ढकलला पाहिजे. सप्ताहाच्या शेवटी जीवनात सन्मान वाढेल.

**शुभ दिवस : २०,२३,२४,२६.**




आर्थिक बाबतीत वेळ अनुकूल राहील आणि प्रगती हळूहळू होईल. या आठवड्यात तब्येतीत बरीच सुधारणा होईल आणि तुम्हांला बरे वाटेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या कुटुंबाशी संबंधित कोणताही ठोस निर्णय घेतला नाही तर बरे होईल. हा आठवडा प्रवासासाठी देखील योग्य नाही आणि आपण ते पुढे ढकलल्यास ते चांगले होईल.नोकरीच्या ठिकाणी वयोवृद्ध व्यक्तीबद्दल मन चिंतेत राहील. आठवड्याच्या शेवटी मन भावुक राहील आणि निराशा वाटेल.

**शुभ दिवस : २०,२३**




आर्थिक बाबतीत वेळ अनुकूल असेल आणि नवीन गुंतवणूक तुमच्यासाठी शुभ परिणाम देईल. धनलाभ होईल. तब्येतीतही हळूहळू सुधारणा होत आहे. जर तुम्ही कुटुंबात आनंददायी वेळ घालवला आणि कुटुंबाशी संबंधित निर्णय नवीन विचाराने घेतले तर चांगले परिणाम मिळतील. या आठवड्यात प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल, अन्यथा त्रास वाढू शकतो. आठवड्याच्या अखेरीस हळूहळू परिस्थिती सुधारण्यास सुरुवात होईल.

**शुभ दिवस : २२,२४**




कामाच्या ठिकाणी हळूहळू सुधारणा होईल आणि तुम्ही नवीन प्रकल्पाकडे आकर्षित व्हाल. आर्थिक बाबतीतही वेळ अनुकूल राहील आणि चांगली बातमी मिळेल. वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाने परिस्थिती सुधारेल. आरोग्यामध्येही तुम्हांला चांगले वाटेल आणि वेळ अनुकूल राहील. या आठवड्यात केलेले प्रवासही शुभ परिणाम देतील. कुटुंबातील एखाद्या गोष्टीच्या चिंतेने मन घेरले जाईल.

**शुभ दिवस : २०,२१,२२,२३,२५.**




कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि जुने प्रकल्प पुन्हा सुरू करता येतील. आर्थिक फायद्यासाठी मजबूत परिस्थिती देखील तयार केली जात आहे आणि तुमच्या गुंतवणुकीबाबत तुम्ही खूप नियंत्रणात असाल. एक नवीन सुरुवात आयुष्यात सुख समृद्धी आणेल. कुटुंबासह इतर लोकांशी भेटीगाठी होतील आणि नवीन मित्र बनतील. या आठवड्यात समतोल साधून जीवनात पुढे गेल्यास प्रवासात नक्कीच सुधारणा होईल. आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सप्ताहाच्या शेवटी सुख-समृद्धीची शक्यता आहे.

**शुभ दिवस : २१,२२,२५,२६**




या आठवड्यात तुम्हांला तुमच्या कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा मिळेल. जीवनात सुख-समृद्धीचे योगायोग येतील. या आठवड्यापासून आरोग्यातही चांगली सुधारणा दिसून येईल. प्रेमसंबंधातील अनुभव लक्षात घेऊन निर्णय घेतल्यास बरे होईल. आर्थिक बाबतीत दानधर्मातून शुभ परिणाम मिळतील. कामाच्या ठिकाणी एखाद्या गोष्टीबद्दल मन अस्वस्थ होईल आणि ही गोष्ट इतर कोणाला सांगू शकणार नाही. प्रवासात हळूहळू यश मिळेल. आठवड्याच्या शेवटी एक नवीन सुरुवात जीवनात सुख समृद्धी आणेल.

**शुभ दिवस : २३,२४,२६**




कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि मान-सन्मान वाढेल. सर्जनशील कार्यातूनही चांगले परिणाम मिळतील. तुम्हांला आरोग्यामध्ये भरपूर ऊर्जा आणि निरोगीपणा जाणवेल. कुटुंबात नवीन सुरुवात केल्याने जीवनात सुखद अनुभव येतील आणि मन प्रसन्न राहील. आर्थिक बाबींमध्येही वेळ अनुकूल राहील आणि आर्थिक लाभाचे प्रसंग येतील. प्रवासात अचानक सुधारणा होऊन यश मिळेल. आठवड्याच्या शेवटी तुम्ही काहीतरी नवीन आणण्याचा प्रयत्न करू शकता. तुम्ही घरातील सामान खरेदीसाठी शॉपिंग देखील करू शकता.

**शुभ दिवस : २१,२३,२४,२६**





आर्थिक बाबतीत वेळ अनुकूल राहील आणि आर्थिक लाभाची परिस्थिती निर्माण होत आहे. हळूहळू कार्य क्षेत्रात प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. तब्येतही सुधारेल आणि तुम्हांला आंतरिक स्वस्थता जाणवेल. कौटुंबिक बाबींमध्ये तणाव वाढू शकतो आणि मन एखाद्याच्या आरोग्याच्या चिंतेने घेरले जाईल. या आठवड्यात तुम्ही प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल. आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य राहील.

**शुभ दिवस : २२,२३**




कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि नवीन सुरुवात तुमच्यासाठी चांगली बातमी घेऊन येईल आणि प्रकल्प यशस्वी होतील. आर्थिक लाभासाठी मजबूत परिस्थिती असेल आणि भागीदारीत केलेली गुंतवणूक तुमच्यासाठी हितदायक ठरेल. कुटुंबात आनंद दार ठोठावेल आणि पार्टी मूडमध्ये असाल. प्रवासही शुभ परिणाम देतील आणि एखाद्या ज्येष्ठाच्या मदतीने तुमचा प्रवास यशस्वी होईल. आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज असून वडिलांसारख्या व्यक्तीच्या तब्येतीबद्दल मन चिंताग्रस्त राहील. आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य राहील.

**शुभ दिवस : २१,२२,२४,२५**




कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि या आठवड्यात कोणतेही दोन प्रकल्प तुमच्यासाठी अतिशय आकर्षक असतील आणि यशाचा मार्ग मोकळा होईल. कुटुंबात आनंदाचे आगमन होईल आणि तुम्हांला अनेक बाबतीत यश मिळेल. प्रवास करताना भविष्याभिमुख राहणे तुमच्या हिताचे असेल. भूतकाळ विसरून प्रवास केल्यास चांगले परिणाम दिसून येतील. या आठवड्यात खर्च जास्त असू शकतो आणि याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आरोग्य नाजूक राहील आणि मन भावुक राहील. सप्ताहाच्या शेवटी जीवनात यशाचा मार्ग मोकळा होईल आणि स्त्रीच्या मदतीने जीवन सुख-समृद्धीकडे वाटचाल करेल.

**शुभ दिवस : २०,२१,२४,२६**





कामाच्या ठिकाणी वेळ अनुकूल आहे आणि तुमच्या आवडीचे प्रकल्प परिणामदायक ठरतील. तुमच्या करिअरला पुढे नेण्यासाठी हा काळ योग्य आहे आणि यशाचा मार्ग मोकळा होईल. आर्थिक बाबींमध्येही संतुलन निर्माण करून गुंतवणूक केली तर धनलाभ होईल. तुम्हांला तब्येत बरी वाटेल आणि एखाद्यासोबत व्यायाम केल्याने आरोग्यासंबंधी तुमच्यासाठी शुभ परिणाम मिळतील. कौटुंबिक बाबींमध्ये काही बंधन असू शकते. या आठवड्यात प्रवास पुढे ढकललात तर बरे होईल, अन्यथा नुकसान सहन करावे लागू शकते. आठवड्याच्या शेवटी तुम्ही एखाद्या गोष्टीबद्दल दुखावले जाल आणि मन उदास राहील.

**शुभ दिवस : २१,२२,२३**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णुपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सोलापूरच्या इको-फ्रेंडली बाप्पांचा यंदा दुबईत डंका



## मूर्तिकार भंडारी यांनी पाठवल्या दोनशे गणेश मूर्ती

✔ सुराज्य/दीपक शेळके

**बाप्पा आले... भाग-३**

ज्या दिवसाची आपण आतुरतेने वाट पाहत आहोत त्या गणपती बाप्पाची सगळीकडे लगबग चालू आहे. विघ्नहर्ता गणरायाचे स्वागत करण्यासाठी सोलापूर नगरी सज्ज झाली आहे. पाण्यामध्ये गणेश बाप्पाचे विसर्जन केल्यावर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्ती विरघळत नाही त्यामुळे जलप्रदूषण होऊन पर्यावरणाची हानी होते. यावर मार्ग म्हणून इको-फ्रेंडली गणेशोत्सव साजरा कारणाऱ्यांवर भर दिला जातो. सोलापुरात देखील ही चळवळ चालू आहे. मोठ्या प्रमाणात इको-फ्रेंडली मुर्तींना मागणी वाढली आहे. यंदा सोलापूरच्या इको-फ्रेंडली बाप्पाचा यंदा दुबईत डंका वाजणार आहे. मूर्तिकार अंबादास भंडारी यांनी बनवलेल्या मातीच्या दोनशे मूर्ती दुबईला रवाना झाल्या आहेत.

आपण खूप सण उत्सव साजरा करताना आनंदात असतो मात्र हे उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होऊ मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होते. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्ती या पाण्यात लवकर विरघळत नाही तर शाडूच्या आणि मातीची मूर्ती पाण्यात लवकर विरघळतात त्यामुळे गणेश भक्तांनी इको-फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यावर भर दिला जातो. या बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. याला चांगला प्रतिसाद देखील मिळत आहे. सोलापूर शहरात देखील अनेक सामाजिक संस्था, मूर्तिकार पर्यावरण प्रेमी समाज प्रबोधन करत जनजागृती करत आहेत. या प्रबोधनाला प्रतिसाद देत सोलापुरातील मूर्तिकार अंबादास भंडारी हे सन २०१२ पासून इको फ्रेंडली मूर्ती तयार करतात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या ऐवजी मातीच्या पर्यावरण पूरक गणपतीच्या मूर्ती तयार करत आहेत. मातीच्या गणेशमुर्ती तयार करण्यासाठी तामिळनाडू राज्यातून माती आणली जाते वर्षभर इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनविण्याचे काम अंबादास भंडारी यांच्याकडून चालू असते यासाठी त्यांचा परिवार दिवसरात्र झटत असतो या तयार केलेल्या इको फ्रेंडली मूर्ती अशोक चौक पोलीस चौकी समोर यांनी पर्यावरण पूरक स्टॉल थाटला आहे. या इको फ्रेंडली गणेश मूर्तींना यंदा गणेश भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. भंडारी यांनी तयार केलेल्या इको फ्रेंडली मूर्तींना सुरत, अहमदाबाद, मुंबई, पुणे, बेंगलोर, म्हैसूर, हैदराबाद इथून मोठी मागणी असते.





### इको-फ्रेंडली मूर्तीने पर्यावरणाची हानी नाही

इको-फ्रेंडली मूर्ती पाण्यामध्ये लवकर विरघळतात तसेच या मूर्तीसाठी वापरले जाणारे रंग कच्चे आणि प्राकृतिक असतात. त्यामुळे पर्यावरणाची कोणतीही हानी होत नाही. शाडूची अथवा मातीच्या मूर्ती घरीच विसर्जन करता येऊ शकते. विरघळलेल्या मातीचा पुन्हा वापर केला जाऊ शकतो. परिणामी पर्यावरण सुरक्षित राहत असल्याने इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा केला जात आहे.

### दुबईला २०० इको-फ्रेंडली मूर्ती रवाना

यंदा पर्यावरण मातीच्या गणेश मूर्तींना दुबई येथूनही यावर्षी मागणी आली आहे. भंडारी यांनी दुबई ला २०० इको फ्रेंडली गणेश मूर्ती पाठविल्या आहेत. आणखी मागणी वाढत आहे. तब्बल पाच हजार गणेश मूर्ती तयार केल्या आहेत.



## मरिआई पोलीस चौकी परिसरात चोरट्यांनी चार दुकाने फोडली

✔ **सुराज्य/सोलापूर** : सोलापूर मंगळवेढा रोडवर असलेल्या मरीआई पोलीस चौकी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चार दुकाने फोडली. बिअर शॉपी मधील पाच हजाराची रोकड घेऊन चोरटे लंपास झाले असून ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मरीआई पोलीस चौक परिसरातील बिअर शॉपी, पटेल कोल्ड्रिंक्स हाउस आणि संकेत मेडिकल स्टोअर्ससह चार दुकाने फोडली. बिअर शॉपी मधील चोरट्यांच्या हाती पाच हजाराची रोकड लागली. परंतु इतर दुकानातून त्यांच्या हाती काही लागले नाही. मेडिकल दुकानात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली आहे. ही घटना झाल्याचे कळताच फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील पथकाने त्या ठिकाणी धाव घेऊन पाहणी केली. चोरट्यांचा तपास चालू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी दिली.

## सुलेरजवळगी येथे घरफोडी; ३० हजारांचा माल लंपास

✔ **सुराज्य/सोलापूर** : सुलेरजवळगी (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या राहुल सुरेश बगले यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने ५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि घरगुती साहित्य असा ३० हजार ५०० रुपयांचा माल पळविला. ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास झाल्याची नोंद अक्कलकोट दक्षिण पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक काकडे पुढील तपास करीत आहेत.

## कोनापुरे चाळीत गळा दाबल्याने मुलगी जखमी

✔ **सुराज्य/सोलापूर** : कोनापुरे चाळीत आमच्या मुलासोबत का बोलते म्हणून गळा दाबल्याने वर्षीय मुलगी जखमी झाली. ही घटना गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी वडिलांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले.मल्लेश वाघमारे याची आई आणि त्याची मावशी या दोघांनी हा प्रकार केला. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

## निधनवृत्त

### अमोल जाधव



✔ **सुराज्य/वेळापूर** : मळोली येथील रहिवासी अमोल वासुदेव जाधव पाटील (वय ३३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी आई, भाऊ, असा परिवार आहे.

### चंद्रशेखर पाटील



✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील रहिवासी चंद्रशेखर रामचंद्र पाटील (वय ६९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, व तीन नातवंडे असा परिवार आहे.

### लक्ष्मी घाडगे



✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील रहिवासी लक्ष्मी तात्या घाडगे (वय ९२) यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन नातू, नात, परतूंडे असा मोठा परिवार आहे

### विमल मोरे



✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर मधीलकोंडी येथील रहिवासी विमल अर्जुन मोरे (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंड असा परिवार आहे.

## थकीत पगार मागणाऱ्यास संतोष पाटलांनी धमकावले

✔ सुराज्य/पंढरपूर

तीन महिन्यांचा थकलेला पगार मागणाऱ्या चालकास भारतीय जनता पक्षाच्या नेत्याने ढकलून देत धमकावले. ही घटना माढा तालुक्यातील मोडनिंब येथे घडली. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यासमोरच घडला.

सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील मोडनिंब येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमास भाजपचे माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांची उपस्थिती होती. त्या वेळी स्थानिक नेते संतोष पाटीलही त्या ठिकाणी उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतानाच संतोष पाटील यांच्याकडे चालक म्हणून काम केलेला संतोष गुरव हा तरुण त्याठिकाणी आला. त्याने पाटील यांना तीन महिन्यांचा पगार देण्याची मागणी केली. त्यावेळी पाटील यांनी त्या तरुणास इकडे ये म्हणत गर्दीच्या बाहेर ढकलत नेत धमकावले. सहा महिन्यांपूर्वीही मी पगाराची मागणी केल्यानंतर असंच धमकावत मला मारल्याचा आरोप त्याने केला आहे. शेवटी पाटील यांनी पोलिसांना संतोष गुरव याला येथून घेऊन जा, अशी सूचना केली.



### दारू पीत असल्याने कामावरून काढले

त्याचा कोणताही पगार थकीत नाही. दारू पीत असल्याने त्याला आपण कामावरून काढले आहे. राजकीय सुडबुद्धीने त्याला फितवून कोणतरी आपल्याला बदनाम करत आहे, असे संतोष पाटील यांनी सांगितले.

## १८ तासानंतर चोरट्याचा मृतदेह विहिरीबाहेर काढला

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : सुलेरजवळगे (ता. अक्कलकोट) येथे शुक्रवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास अनोळखी इसम घरफोडी चोरी करून पळून जात अपघाताने पडक्या विहरीत पडून बुडून मयत झाला. दरम्यान, वनरक्षकांच्या मदतीने ग्रामस्थ, पोलीस प्रशासनाच्या मदतीने अखेर १८ तासाच्या प्रदीर्घ प्रयत्नानंतर मृतदेह बाहेर काढण्यास यश आले. मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही.

**ओळख अद्याप पटली नाही; तपास सुरू**

ग्रामसुरक्षा यंत्रणामार्फत गावात चोर आल्याचा पाठवलेला संदेश मिळाल्याने गावकरी चोराच्या शोधात बाहेर पडले. ग्रामस्थांनी पाठलाग सुरू केला. चोरटा पुढे पळत गेला आणि अपघाताने विहिरीत पडून बुडून मयत झाला. जीवरक्षकांच्या मदतीने ग्रामस्थ, पोलीस प्रशासनाच्या मदतीने १८ तासाच्या प्रदीर्घ प्रयत्नानंतर मृतदेह बाहेर काढला. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकडे हे करीत आहेत. पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकडे, उपनिरीक्षक प्रवीण लोकरे, जगदीश राठोड, पोलीस नाईक मल्लिकार्जुन गोटे, पांढरे आदींनी घटनास्थळी भेट दिली. मृतदेहाची ओळख पटली नाही. मोबाईल सापडला आहे. सीडीआर काढत आहोत, कॉल हिस्टरी चेक केले जात आहे, असे स.पो. नि. बाळासाहेब काकडे यांनी सांगितले.

## स्वेरीमध्ये 'संधी - सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योजक'वर चर्चासत्र

✔ **सुराज्य/पंढरपूर** : गोपाळपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अ‍ॅन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात अ‍ॅक्सलरेशन अ‍ॅन्ड इंक्यूबेशन: विद्यार्थी आणि विद्याशाखांसाठी संधी- सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योजक' या विषयावर एकदिवसीय उद्योजकता विकासपर सत्र' संपन्न झाले. या ऑनलाईन कार्यक्रमात 'सोबस इनसाईट फोरमचे कम्युनिटी अ‍ॅन्ड प्रोग्रामचे संचालक गिरीश संपथ यांनी इनक्यूबेटर'चे मुख्य कार्य म्हणजे ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी अथवा स्टार्ट अप' साठी भांडवल नसते अशा लोकांना मदत करणे याबद्दल मार्गदर्शन केले.

## गव्हाबरोबर किडे रगडू नका अन्यथा नोटिसीची होळी करणार

### जानराव यांचा इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

गव्हाबरोबर किडे रगडू नका. खाडी मांडण्यापेक्षा रजा गृहीत धरावी ही विनंती आहे. तरीही जर सूडबुध्दीने कारवाई झाली तर दिलेल्या देण्यात येणाऱ्या नोटीसीची होळी करण्यात येईल अशी भूमिका सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांनी मांडली आहे.

लाक्षणिक संपात काम बंद करून सहभागी झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे परिपत्रक महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी बुधवारी काढले होते. मात्र आदेश धुडकावत महापालिका कर्मचाऱ्यांनी गुरुवारच्या महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या लाक्षणिक संपात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यामुळे संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांना नोटीस बजावून कायम कर्मचाऱ्यांची वेतन कपात तर मानधनावरील कामगारांना कामा वरून काढण्यासंदर्भात आयुक्तांनी सूतोवाच केले. संघटनेचे पदाधिकारी कुठे, काय काम करतात याचीही माहिती जीएडी कडून मागवली. यामुळे कामगार वर्गात खळबळ उडाली आहे. जानराव यांनी म्हटले आहे की, गव्हाबरोबर किडे रगडण्याची पध्दत बंद करा. आम्ही सहन करणार नाही. जर कारवाई झाली तर दिलेल्या नोटीसीची होळी करण्यात येईल. महापालिका आयुक्तांची बदली होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील.

## अनगरमध्ये भर दिवसा घरफोडी

✔ **सुराज्य/मोहोळ** : बंद घराचा कुलूप उचकटून अज्ञात चोराट्यांनी एक लाख ७० हजाराचा ऐवज लंपास केला ही घटना अनगर येथे शुक्रवारी भर दुपारी १९ ऑगस्ट रोजी घडली.

अनगर येथील दत्तात्रय तुकाराम गुंड हे त्यांची पत्नी व मुलाला घेऊन पासलेवाडी येथे गेले होते. दुपारी चार वाजता माघारी आले असता कडी कोयंडा उचकटलेला दिसला. त्यांनी आत मध्ये जाऊन पहिले असता कपाट उचकटले दिसले. त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. घरातील फुले, झुबे तुसे व रोख रक्कम १० हजार रुपये असा १ लाख ७० हजार रुपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेले. गुंड यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. मोहोळ पोलीस करत आहेत.

## ज्ञानेश्वर संस्कृत महाविद्यालयात ध्वजारोहण

✔ सुराज्य/सोलापूर



ज्ञानेश्वर संस्कृत महाविद्यालय व वसंतराव देशमुख विद्याविकास प्रशालेच्या संयुक्त विद्यमाने तेरा मैल, बसवनगर, दक्षिण सोलापूर येथे अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. यावेळी ध्वजारोहण धनलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन अमोघसिद्ध वाघमारे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राह्मण सेवा संघाचे सचिव मोहन देशपांडे होते तर संचालक मोहन मोकाशी, दत्तराज कुलकर्णी, गिरीष कुलकर्णी, भीमाशंकर सनगुंदी, उमेश गायकवाड, राजकुमार कट्टीमनी, महेश इंगळे आदींची प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह. भ. प. ज्ञानेश्वर (महाराज) रणशूर यांनी केले. अमोघसिद्ध वाघमारे यांनी तरुणांनी समाजाला मदत करावी, अशी इच्छा व्यक्त केली. यावेळी मोहन मोकाशी यांनी आपले विचार व्यक्त केले. मोहन देशपांडे यांनी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य सेनानींकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार संस्कृत विद्यालयाचे पी.आर.ओ. जोशी यांनी मानले. सूत्रसंचालन एस.एस. फडके यांनी केले, या कार्यक्रमास एस. एस. देशपांडे, पी. जे. देशपांडे, एस.डी. मोरे , एम.एस. सोवनी यांचे सहकार्य लाभले. यावेळी संस्कृत महाविद्यालयातर्फे सर्वांना खाऊ वाटप करण्यात आला.

## किरण नवगिरेची भारतीय महिला क्रिकेट संघात ट्वेंटी-ट्वेंटीसाठी निवड

✔ सुराज्य/श्रीपूर

मिरे तालुका माळशिरस येथील किरण प्रभू नवगिरे हिचे भारतीय महिला क्रिकेट संघात ट्वेंटी-ट्वेंटी संघात इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाल्याने सोलापूर जिल्ह्यातील मिरे, श्रीपूर अकलूजसह सोलापूर जिल्ह्यात किरण नवगिरे हिचे निवडीबद्दल अभिनंदन केले जात आहे.

अनघा देशपांडे नंतर भारतीय संघात स्थान मिळवणारी किरण नवगिरे सोलापूरची दुसरी खेळाडू आहे. प्रतिकूल परिस्थितीतून श्रीपुरच्या चंद्रशेखर विद्यालयात शिकत विविध क्रीडा स्पर्धा गाजवत पुढे पुणे विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघ, तसेच नागालँड, अरुणाचल प्रदेश कडुन खेळत सराव, सातत्य यातून भारतीय महिला संघात स्थान मिळवले आहे. ट्वेंटी-ट्वेंटी मध्ये झालेल्या ऑल इंडिया वुमन्स २०-२० क्रिकेट स्पर्धेत किरणने ८४ चेंडूत २०९ धावा काढल्या होत्या त्यामध्ये १७ षटकार व २३ चौकारांचा तिने धावांचा पाऊसच पडला होता. त्यामुळे तिला गेल्या वर्षापासून नागालँड रणजी क्रिकेट संघामधून संधी मिळून ती त्या संघाकडून उत्तम अशी कामगिरी करत आहे. तसेच वरिष्ठ महिलांच्या २०-२० सामन्यात सर्वात वैयक्तिक धावांचा विक्रम नागालँड कडून खेळताना तिने अरुणाचल प्रदेश विरुध्द केवळ ७६ चेंडूत १६२ धावा काढल्या होत्या त्यामध्ये १५० हून अधिक धावा करणारी किरण नवगीरे ही भारताची पहिली खेळाडू ठरली होती. किरण नवगिरे हिने शालेय जीवनातही श्री चंद्रशेखर विद्यालयामध्ये भाला फेक, गोळा फेक, १०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे या शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये मोठे यश मिळवलेले होते.



### मिळालेल्या संधीचे सोने करणार

मला मोठ्या स्पर्धा खेळण्याची संधी मिळत आहे. त्यामध्ये चांगली कामगिरी करून मिळालेल्या संधीचे सोने करायचे आहे. या काम माझ्या आई-वडिलांचे प्रशिक्षकांचे मोठे प्रोत्साहन मिळत आहे, असे किरण नवगिरे हिने सांगितले.

## भाजीपाल्यांच्या दरात घसरण



कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शनिवार, २० ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार कारली, वांगी, ढोवळी मिरची, गवार, फ्लॉवर, हिरवी मिरची, मेथी भाजी, कांदा, शिराळी दोडका, पालक, टोमॅटो आदींच्या दरात प्रतिक्किंटल १०० ते हजार रूपये घसरण झाली. तर चाकवत, अंबाडी भाजी, तांदूळ, शेपू, गहू आदींच्या किंमती स्थिर राहिल्या. तसेच कोबी, कोथिंबीर, पेरू, कांदा पात, लिंबू, ज्वारी यांच्या दरात प्रतिक्किंटल १०० ते ८०० रूपये वाढ झाली.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ९०० | २, ००० | १, १०० |
| कारली | १, ००० | ४, ००० | २, ००० |
| वांगी | १, ५०० | ५, ००० | २, ५०० |
| कोबी | ५०० | १, १०० | ९०० |
| ढोवळी मिरची | ५०० | २, २०० | १, ००० |
| गवार | ४, ००० | ७, ५०० | ५, ००० |
| कोथिंबीर | ३०० | १, ३०० | ९०० |
| काकडी | ६०० | ६, ००० | ३, ००० |
| फ्लॉवर | १६० | ८८० | ३२० |
| चाकवत | ३०० | ५०० | ४०० |
| हिरवी मिरची | २, ५०० | ४, ५०० | ३, ००० |
| अंबाडी भाजी | ५०० | ६०० | ५०० |
| कांदा पात | ७०० | ८०० | ७०० |
| मेथी भाजी | ५०० | १, ४०० | १, ००० |
| राजगिरा | ४०० | ७०० | ६०० |
| लिंबू | १, ८०० | ४, २५० | ३, ००० |
| तांदूळ | २, ९८० | ६, ३०० | ३, ६६० |
| दोडका | ७०० | ४, ००० | २, ५०० |
| शेपू | ३५० | ७०० | ५०० |
| ज्वारी | २, ०४० | २, ५४५ | २, ५१५ |
| कांदा | १०० | २, २०० | १, ००० |
| पालक | ८०० | १, २०० | १, ००० |
| टोमॅटो | २०० | १, ३०० | ६०० |
| गहू | २, २९० | ३, २७५ | २, ६८५ |



# आरक्षणाची लढाई आणखी बुलंद करणे हीच मेटेंना खरी श्रद्धांजली : शिंदे

✔ सुराज्य/सोलापूर

**मराठा आरक्षण अंतिम टप्प्यात आले असताना विनायकराव मेटे यांचे निधन दुर्दैवी आहे. त्यांच्या जाण्याने आरक्षणाची ही चळवळ थांबणार नाही किंबहुना ती अधिक बुलंद करणे हीच खरी स्व. विनायक मेटे यांना श्रद्धांजली ठरेल. त्यासाठी समाजाने ताकद एकवटली पाहिजे, अशी अपेक्षा शिवसंग्रामचे प्रदेशाध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी व्यक्त केली.**

शिवसंग्रामचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. विनायक मेटे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सोलापुरात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी तानाजीराव शिंदे बोलत होते. मेटे यांच्या प्रतिमेचे पूजन शहरातील भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख

**शोकसभेत मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली**

आणि तानाजीराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी महापौर मनोहर सपाटे, विक्रम देशमुख, अशोक मुळीक, मराठा सेवा संघाचे प्रशांत पाटील, सकल मराठा समाजाचे समन्वयक माउली पवार, दत्तामामा मुळे, अमोलबापू शिंदे, राजन जाधव, विनोद भोसले, श्रीकांत घाडगे, सचिन गायकवाड, विनोद पाटील, आकाश पवार ॲड. सुरेश गायकवाड, सुनील नागणे, माउली झांबरे, अण्णासाहेब पाटील, सागर गायकवाड, विलास कोल्हे यांनी स्व. विनायक मेटे यांच्या विविध क्षेत्रातील कामाची माहिती देताना चळवळीचा, संघर्षाचा आढावा घेतला.

याप्रसंगी उत्तर सोलापूर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शालिवाहन माने देशमुख, तानाजीराव जाधव, ज्ञानेश्वर डंगोले, बाबासाहेब जाधव, लहू गायकवाड, विजय क्षीरसागर, माउली जाधव गंगाधर गायकवाड, श्याम पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# जागेच्या कारणावरून फायटरने मारहाण

**तीन जणांवर गुन्हा**

✔ सुराज्य/सोलापूर

जागेच्या कारणावरून शिवीगाळ करत फायटरने मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी पावणे दहा वाजण्याच्या सुमारास बेडर पूल जुनी तालीम येथे घडली. याप्रकरणी भरत दगडू पंतुवाले (वय-२४, रा. मु. पो. खडकी, जिल्हा उस्मानाबाद) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मी बन्सी बंबेवाले, गणेश बन्सी बंबेवाले, सचिन बन्सी बंबेवाले (सर्व रा. बेडर पूल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांची मोठी बहीण सुरेखा गणेश बंबेवाले यांना जागेच्या कारणावरून वरील तिघांनी शिवीगाळ करीत मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी व फिर्यादी यांची आई वरील तिघांना वाद करू नका, बहिणीस मारहाण करू नका असे म्हणाले असता, त्यावेळी तिघांनी फिर्यादी व फिर्यादीची आई यांना तुम्ही आमच्या भांडणात का पडता असे म्हणून त्यांना देखील लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच सचिन याने त्याच्या जवळील फायटरने मारून दुखापत केली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ९० हजाराला फसविले

ॲक्सिस बँकेतून बोलत आहे. तुम्हांला बोनस मिळाला आहे. तुमच्या क्रेडिट कार्डचा लिमिट जास्त करायचा आहे का असे खोटे सांगून ओटीपीचा गैरवापर करून ८९ हजार ७४७ रुपयांची फसवणूक केल्याची घटना दि. १३ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ४ येथे घडली.

याप्रकरणी अनिल सिताराम जाधव (वय-५३, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ४ यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ८६०४१९५५५५ या क्रमांकाच्या मोबाईलधारकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांना बोनस मिळाला आहे व क्रेडिट कार्डचा लिमिट जास्त करायचा आहे का असे सांगून ओटीपी नंबर देण्यास भाग पाडून त्याचा गैरवापर करून क्रेडिट कार्डवरून वेळोवेळी रक्कम ट्रांझॅक्शन करून एकूण ८९ हजार ७४७ रुपयांची फसवणूक केली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाबळे हे करीत आहेत.

## दुचाकीला आग लावून ४० हजारांचे नुकसान

अज्ञात इसमाने दुचाकीला आग




लावून ४० हजारांचे नुकसान केल्याची घटना दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री विजय देशमुख नगर विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी रूपाली बंडू पारवे (वय-३८, रा. विजय देशमुख नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांच्या राहत्या घरासमोरील मध्यरात्री कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पेट्रोलच्या सहाय्याने दुचाकी क्रमांक एम. एच.१३.डीएन ३७०१ याला आग लावून ४० हजारांचे नुकसान केले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक सोनार हे करीत आहे.

## अल्पवयीन मुलीला पळविले

एका १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची घटना दि.१६ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या दरम्यान सोलापुरात येथे घडली.

याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास मुलाणी हे करीत आहेत.

# बागबान फाउंडेशनचा वधू-वर मेळावा

✔ सुराज्य/सोलापूर

बागबान हेल्प केअर फाउंडेशन सोलापूर आणि जोडभावी पेठ मोहल्ला अल्पसंख्याक बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या मुस्लीम समाजातील वधू-वर परिचय मेळाव्यात ८०० वधू-वरांची नोंदणी केली. यावेळी असंख्य पालकांनी सहभाग घेतला.

दिवसभर चाललेल्या मेळाव्यात सोलापूरसह मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, बीड, नांदेड, जयसिंगपूर, औरंगाबाद, अहमदनगर, अक्कलकोट, इंदापूर, बारामती, अकलूज, गुलबर्गा ठिकाणाहून वधू-वर आले होते.

# टॅलेंट ओळखल्यास यश निश्चित मिळते : प्रा. जोशी

## आझाद एज्युकेशन ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

**'माणूस जन्मत: हुशार नसतो. अनुभवातून तो शिकत जातो. प्रत्येकाने स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. प्रत्येकामध्ये एक खास टॅलेंट असते, ते ओळखून त्याप्रमाणे मार्गक्रमण केल्यास यश निश्चित मिळते', असे प्रतिपादन प्रा. ए. डी. जोशी यांनी केले.**

आझाद एज्युकेशन ट्रस्ट व केएमसी चॅरिटेबल ट्रस्ट व आर. के. ॲकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्योहार मीलन व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमास मुंबईचे उद्योगपती




ताजुद्दीन मुजाहिद उपस्थित होते. यावेळी ॲड. मिलिंद थोबडे, माजी नगरसेवक रियाज खरादी, ताजुद्दीन मुजाहिद, केतन शहा, प्रा. डॉ. हरून बागवान, प्रा. डॉ. इफ्तेखार खरादी, ॲड. झहीर सगरी, ॲड. रियाज शेख, डॉ. नदीम अख्तर, मैनोद्दीन शेख, हाजी फारुख काझी, हाजी जमीर शेख, शकील मौलवी, शाहीद खरादी, युसुफ खरादी, शरीफ खरादी उपस्थित होते.

यावेळी प्रा. जोशी म्हणाले की, 'धर्म कोणताही असला तरी प्रत्येक धर्मात शिक्षणाला महत्त्व आहे. आज आमच्या कॉलेज आणि क्लासेसमध्ये सर्वाधिक मुस्लीम मुलेच शिक्षणात अग्रेसर आहेत. धर्माने नाही तर शिक्षणाने माणूस मोठा होता. यावेळी माजी नगरसेवक रियाज खरादी म्हणाले की, 'आम्ही मुस्लीम आहोत याचा आम्हांला गर्व आहे. मात्र आम्ही सर्व प्रथम हिंदुस्थानी आहोत हे सांगतानाही आम्हांला अभिमान वाटतो. आज मुस्लीम समाजातील मुलेही शिक्षणात पुढे जात आहेत. आपल्याला लोकांबरोबर रहायचे असेल तर उच्च शिक्षण घेणे आवश्यक आहे. यावेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी मुस्लीम समाजातील गुणवंत विद्यार्थी अब्दुल रहमान खरादी, हुदा मुजाहिद, फरहीन शेख, तहेसीन शेख आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी मुफीज मायामी, दाऊद इकरल, जहांगीर विजापुरे, मुबीन फडणीस शरीफ भागानगरी, रिजवान शिलार आदींनी परिश्रम घेतले.

# शेळी, बोकडांची आबावाडीत चोरी

✔ सुराज्य/अक्कलकोट

**श्रावण महिन्यात मांसाहारी खवय्यांकडून बेत रचले जात नाहीत. या महिन्यात चिकन, मटण, मासळीला मागणी कमी झालेली असताना देखील चोरट्यांनी आबावाडी येथील एका शेतकऱ्याचे शेतातून सुमारे १ लाख ५६ हजार रुपये किंमतीची १२ शेळ्या आणि ६ बोकड चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे.**



याबाबत अनिल रुपसिंग चव्हाण यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अक्कलकोट- स्टेशन मार्गावर आबावाडी परिसरात चव्हाण यांची शेती आहे. शेतात शेड असून तेथे चव्हाण यांनी शेळ्या, बोकड बांधून ठेवला होता. मध्यरात्री चोरटे चव्हाण यांच्या शेतात शिरले. शेडमध्ये बांधलेल्या गावरान जातीच्या बारा शेळ्या आणि सहा बोकड चोरट्यांनी लांबविला.

शेडमध्ये बांधलेल्या शेळ्या आणि बोकड चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर चव्हाण यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून शेळ्या, बोकड चोरणाऱ्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. अधिक तपास पोलीस नाईक असिफ शेख हे करीत आहेत.

# 'दलित वस्तीसाठीचा निधी दलित वस्तीसाठीच वर्ग करावा'

✔ सुराज्य/सोलापूर

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील रस्त्याचे काम दलित वस्तीच्या निधीमधून सुरू आहे. हे काम तात्काळ थांबवावे दलित वस्तीसाठी असलेला निधी तात्काळ दलित वस्तीच्या कामासाठीच वर्ग करावा अन्यथा तीव्र स्वरूपाच्या आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड. विनोद कांबळे यांनी दिला.**

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रमुख रस्त्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सदरचा रस्ता दलित वस्ती निधीतून सुरू असल्याबाबत तक्रार आल्याने त्या रस्त्याचे काम तूर्तास थांबवण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करणार आहे. त्या समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांनी सांगितले.**

मोहोळ येथे शुक्रवारी ॲड. विनोद कांबळे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रियाज शेख, संजय पडवळकर, मंगेश पांढरे, बाबूराव ढाणके, संतोष सोलनकर, नागेश बिराजदार आदी उपस्थित होते. पुढे ॲड. कांबळे म्हणाले की, 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मोहोळ नगरपरिषदेला मंजूर असलेल्या निधीतून दलित वस्तीत काम न करता इतर ठिकाणी निधी खर्च करून काम सुरू आहे. मात्र सदरील काम हे दलित वस्तीमध्ये येत नसून तो प्रभाग क्रमांक जुना १० नंबर आहे, तरी दलित वस्तीचा निधी हा मर्यादित स्वरूपाचा असतो. नगर परिषद हद्दीत काम करत असताना ती जागा नगर परिषदेकडे वर्ग करावे लागते परंतु तसे न करता टक्केवारीच्या आमिषापोटी मुख्याधिकारी व इंजिनिअर यांनी या कामास मंजुरी दिली असल्याचा आरोप विनोद कांबळे यांनी केला.

दलित वस्तीचा असलेला निधी दलित वस्तीच्या कामासाठीच तात्काळ वर्ग करावा व सदरील काम थांबवावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी कांबळे यांनी सांगितले.

# बीएमआयटीतर्फे २३ रोजी व्याख्यानाचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर :

बीएमआयटीतर्फे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने यांच्या संकल्पनेतून प्रसिद्ध व्याख्याते मयूर कलबग यांचे व्याख्यान मंगळवार दि. २३ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

या व्याख्यानामध्ये ब्रह्मदेवदादा माने शैक्षणिक संकुलातील बिएमआयटी, बीएमपी, बीएमजेसी, लिटल हार्ट स्कूलमधील सर्व विद्यार्थी-शिक्षकवृंद व कर्मचारी सहभागी होणार आहेत. हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, संस्थेच्या सचिवा जयश्री माने, कॅम्पस डायरेक्टर राहुल माने व बीएमआयटीचे उपप्राचार्य प्रा. एस. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात येत आहे.

# टाकळी येथील जुगार अड्ड्यावर कारवाई

**२९ जण ताब्यात; मंद्रुप पोलिसांची कारवाई**

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे मंद्रुप पोलिसांनी धाड टाकत मन्ना जुगार खेळणाऱ्या तीस जणांना अटक केली.**

**टाकळी येथे सायंकाळी ६ वाजता श्रीमंत बगले यांच्या शेतातील पत्रा शेडमध्ये ५२ पत्ते पानावर मन्ना नावाचा जुगार खेळताना २९ जण मिळून आले. त्यांच्याकडून २ लाखांपेक्षा जास्त रक्कम, दोन चार चाकी वाहने व एक मोटरसायकल असे एकूण १५ लाख ३९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.**

याप्रकरणी भारत सिद्राम शिंदे (वय ३०, वर्षे रा. चडचण, ता. इंडी), विठ्ठल वालू जाधव (वय ५० वर्षे रा. निंगदली, ता. इंडी), सुभाष गोविंद राठोड (रा. लिंबाळ, ता. इंडी), बाबू हाजीमलंग धडेद (रा. निंगदली ता. इंडी,) हणमंत दर्गाप्पा झळकी (रा. जेउर, ता. इंडी), अप्पू हरिबा जाधव, नागेश रामकृष्ण गायकवाड, शासप्पा रामण्णा वडर, गुरुशांत चिदानंद बगले, लक्ष्मण यलप्पा जाधव, निजाम अब्दूल समदखान, दस्तगीर कलीमसाब दडेल, इस्माईल कासीम दडेल, कल्लणगौडा बाळासाहेब बिराजदार, बाबू विठ्ठल पुजारी, दिग्विजय लिंगराज गायकवाड, शालम फकुददीन शेख, मल्लू फुलसिंग जाधव, हसन रजाकसाब जमखंडी, सिध्दू परसप्पा कोळी, रमेश कलप्पा सिरहटी, हरिदास अर्जुन गायकवाड, मल्लू विठ्ठल ममदापुरे, अब्दुल रफीक, अब्दुल रज्जाक उमराणी, हणमंत बसप्पा पुजारी, दत्ता लक्ष्मण जाधव, हसन कारिमसाब दडेल, यशवंतराय हुलकंटराय हेरूर, मेहबूब सैफन शेख, सागर श्रीमंत बगले यांना ताब्यात घेतले आहे.

**अवैध धंद्यावर यापुढेही कडक कारवाई करणार : मांजरे**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप हद्दीतील कोणीही जर अवैध दारू - जुगार - मटका चालवत असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व या अवैध धंद्यामध्ये असलेल्या सर्वांना ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत चांगल्या व्यवसायाकडे करण्यासाठी मंद्रुप पोलीस स्टेशनकडून सहकार्य केली जाईल, असे सपोनि रवींद्र मांजरे यांनी सांगितले.

मंद्रुप पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक रवींद्र मांजरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास मंद्रुप पोलीस स्टेशनचे ए. पी. आय अमितकुमार करपे करीत आहेत.

# एकीकडे आयुक्तांविरोधात मोर्चा; दुसरीकडे सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

**पालिकेच्या हितासाठी प्रशासकीय कामकाजात शिस्त लागावी म्हणून आयुक्तांनी घेतलेले निर्णय योग्यच आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रमाने सोलापूरकर शहरात देशप्रेमाचे वातावरण तयार करण्याचं त्यांचे कार्य गौरवास्पद असल्याचे सांगत माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी शुक्रवारी पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांचा सत्कार केला.**

गुरूवारी 'आयुक्त हटाओ' म्हणून मोर्चा निघाला होता तर दुसरीकडे त्यांचा स्तुत्य कार्याबद्दल सत्कार करण्यात



आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिका आवारात शंभर फुटी राष्ट्रध्वज उभारून देशप्रेमाची भावना अधिक दृढ केली. महापालिकेच्या इमारतींवर तिरंगा विद्युत रोषणाई केली.

एक आगळावेगळा सोहळा साजरा करत आयुक्तांनी नवा इतिहास घडविला. याबद्दल गुरुवारी आयुक्त कार्यालयात आयुक्त पी. शिवशंकर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक गणेश पुजारी, मान्यवर व्यापारी आणि प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. कोरोना महामारीच्या काळात सर्वसामान्य सोलापूरकरांना दिलासा दिला. आवश्यक ती वैद्यकीय सेवा तात्काळ उपलब्ध करून दिली. शहराच्या विकासाला गती प्राप्त करून देण्यात मोठे योगदान दिले, असे चंदनशिवे यांनी सांगितले.

**तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू!**

इतकेच नाहीतर पालिकेच्या प्रशासकीय कामकाजात सुधारणा करण्यात आयुक्त पी. शिवशंकर यांचे मोठे योगदान आहे. कर्तव्य दक्ष, प्रामाणिक अधिकारी आहेत. हे आम्ही अनुभवले आहे. शहराच्या विकासाला गती देण्यासाठी आम्ही तुमच्या पाठिशी खंबीर पणे उभे राहू, अशी ग्वाही माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी दिली.



# इनरव्हीलच्या अध्यक्षपदी डॉ. जवंजाळ; सचिवपदी गवळी

✔ सुराज्य/निमगांव

अकलूजच्या इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी डॉ. श्रद्धा राहुल जवंजाळ तर सचिव पदी डॉ. अर्चना सचिन गवळी यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मावळत्या अध्यक्षा मेघा जामदार होत्या. नूतन अध्यक्षा डॉ. श्रद्धा जवंजाळ यांना मावळत्या अध्यक्षा मेघा जामदार यांनी चार्टर आणि लेपल पिन देऊन अध्यक्षपदाचा कार्यभार सुपूर्द केला तर नूतन उपाध्यक्ष डॉ. अर्चना गवळी, संयुक्त दोशी, ट्रेजरर मृणाल दोशी, आयएसओ अमोलिका जामदार, एडिटर सारंग गिरमे व सीसी रश्मी शहा यांनाही लेपल पिन प्रदान करण्यात आल्या.

यावेळी नूतन अध्यक्षांनी वर्षभरातील नियोजित उपक्रमांची माहिती सादर केली.

जिल्हा परिषदेतील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप तसेच वर्षभरात विविध सामाजिक उपक्रमांचे नियोजन सांगून आरोग्य आणि शैक्षणिक उपक्रमांवर भर देण्यात येणार असून महिला सक्षमीकरण, पर्यावरण, वृक्षारोपण आदीसह गरजू महिलांना उदरनिर्वाहासाठी मदत केली जाईल, असे सांगितले.

CMYK

# जिजाऊंनी कौतुकाची थाप देऊन नवरत्न घडवले : प्रा. बानगुडे-पाटील





सुराज्य/नातेपुते

माँसाहेब जिजाऊ यांनी कौतुकाची एक थाप देऊन तानाजी मालुसरेंसारखे लढवय्ये नवरत्न घडवले. ज्या समाजात कौतुकाची थाप देणारी माणसे असतात तेथे नवरत्न घडत असतात. या कौतुकाच्या थापेवरच उद्याचे तानाजी, मालूजी उभे राहतील. जेथे रयतेचे राज्य असते तेथे लोक मरायला अन् मारायला मागेपुढे पाहत नाहीत. शिवरायांचे स्वराज्य हे कौतुकाच्या थापेवरच उभे राहिले होते', असे प्रतिपादन शिवचरित्राचे अभ्यासक प्रा. नितीन बानुगडे पाटील यांनी येथे व्यक्त केले.

नातेपुते येथील डॉ. बा. ज. दाते प्रशाला येथे अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रम प्रसंगी बानगुडे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मामासाहेब आपण खऱ्या अर्थाने श्रीमंत आहात. एवढा प्रचंड मोठा समुदाय आपले कौतुक करण्यासाठी जमला आहे ज्या माणसाच्या पाठीशी अशी श्रीमंती असते त्याला पराभव कधीही वाटायला येत नाही ही सगळ्यात मोठी वस्तुस्थिती असल्याचे सांगत त्यांनी पांढरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले की, मामासाहेब पांढरे यांनी समाजकारण करत असताना राजकारणात प्रवेश केला. चांगल्या पध्दतीने सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रात गावाच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मामांनी दिलेल्या संधींचं सोनं केले, त्याला सुध्दा कर्तृत्व लागते संधी माणूस एकदाच देतो त्या संधीच्या जोरावर कर्तृत्वाची अनेक पदे मामांनी मिळवली आहेत. यावेळी व्यासपीठावर सत्कारमूर्ती अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, समाजरत्न राजेंद्र पाटील, अहिल्यादेवी पतसंस्थेचे चेअरमन रघुनाथ कवितके, उद्योजक अतुल बावकर, नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, सार्वजनिक बांधकाम सभापती अतुल पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता स्वाती बावकर, महिला व बाल कल्याण सभापती संगिता काळे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, नातेपुतेचे स. पो. नि. मनोज सोलवणकर तसेच सर्व नगरसेवक नगरसेविका, उपस्थित होत. मान्यवरांच्या उपस्थितीत बाबाराजे देशमुख नितीन बानगुडे पाटील यांच्या शुभहस्ते मामासाहेब पांढरे यांचा वाढदिवसानिमित्त सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास तरुणांची तसेच नागरिक व महिलांची मोठी उपस्थिती होती.

# अवैध धंद्यांना परवानगी; मग पूजा साहित्य विक्रेत्यांना का नाही?

## आ. देशमुख यांचा आयुक्तांना सवाल

सुराज्य/सोलापूर

शहरात अवैध धंद्यांना परवानगी मिळते तर पूजा साहित्य विक्रेत्यांना परवानगी का नाकारली जाते असा सवाल उपस्थित करत माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांनी पालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. परवानगी द्या, अथवा न द्या आम्ही पूजा साहित्य विक्रीचे स्टॉल उभे करू अशी भूमिका घेतली.

शनिवारी माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांची भेट घेऊन व्यापाऱ्यांची बाजू मांडली. त्यांनी गणेशोत्सव, नवरात्र महोत्सव काळामध्ये पूजेचे साहित्य, गणपती, गौरी, आरास, मूर्ती साहित्य विक्री करणाऱ्यांना टिळक चौक, कोंतम चौक दरम्यान दुकान टाकण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी यावेळी केली. पण पोलीस आयुक्तांनी टिळक चौक ते कोंतम चौक दरम्यान वाहतुकीची कोंडी निर्माण होत आल्याने परवानगी नाकारल्याचे माहिती पालिका आयुक्तांनी देताच माजी आमदार विजयकुमार देशमुख यांनी पालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन धारेवर धरले. पूजा साहित्य, मूर्ती विक्रेत्यांना जाणीवपूर्वक अडचण निर्माण करीत आहे, त्यांना परवानगी द्या, अथवा न द्या आम्ही पूजा साहित्य विक्रीचे स्टॉल उभे करू असा सज्जड दम दिला.

यावेळी माजी नगरसेवक संजय कोळी, शिवानंद पाटील, नागेश भोगडे आणि टिळक चौक येथील व्यापारी विक्रेते उपस्थित होते.

# तिलाटी-होटगी स्टेशनदरम्यान नागरिकांचे अतोनात हाल

## रेल्वेच्या ४ फाटकांमुळे होतोय वाहतुकीची कोंडी

सुराज्य/सोलापूर



दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिलाटी रेल्वे स्टेशन ते होटगी रेल्वे स्टेशन दरम्यान आठ किलोमीटर अंतरामध्ये रेल्वेचे तब्बल चार फाटक आहेत. सतत रेल्वेच्या दळणवळणामुळे फाटक १० ते ३० मिनिटे कालावधीकरिता बंद करून वाहतूक रोखून धरली जाते. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार आणि रुग्णांना निश्चित वेळेत पोहोचणे होत नसल्याने खूप मोठा त्रास दररोज सहन करावा लागत आहे.

सोलापूर-गुलबर्गा रेल्वे महामार्गावर तिलाटी रेल्वे स्टेशनजवळ पहिला मध्य रेल्वेचा ६१ क्रमांक रेल्वे फाटक आहे. दुसरा चेट्टीनाड सिमेंट कंपनीचा रेल्वे फाटक व तिसरा झुआरी सिमेंट कंपनीचा रेल्वे फाटक आहे. तर चौथा हा होटगी स्टेशनजवळ अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचा रेल्वे फाटक आहे. इंगळगी, शिरवळ, कणबस, जेऊर, करजगी, पानमंगरूळ, आलेगाव, आचेगाव, औज, अक्कलकोट स्टेशन, तडवळ, शावळ, हैद्रा, मणूर या गावासह सीमावर्ती भागातील विद्यार्थी, नागरिक, नोकरदार, रुग्ण सोलापूरला येण्या-जाण्यासाठी तिलाटी रेल्वेस्टेशन ते होटगी रेल्वे स्टेशन मार्गावरूनच प्रवास करतात. मात्र ६१ क्रमांक रेल्वे फाटक आणि अन्य तीन सिमेंट फॅक्टरीचे रेल्वे फाटक सतत बंद होत असल्यामुळे येथे रस्ता बंद करून वाहतूक रोखून धरले जाते. नागरिकांना विनाकारण त्रास दिला जातो. विद्यार्थी, नोकरदार आणि रुग्णांना याचा दररोज खूप मोठा फटका बसत आहे. सतत रेल्वे फाटक बंद करत असल्यामुळे विनाकारण त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासाठी इंगळगी ग्रामपंचायतीकडून राहुल वंजारे व सागर धुळवे यांनी आमदार सुभाष देशमुख यांना शनिवारी निवेदन दिले.

## रेवणसिध्देश्वर मंदिरात आज विविध कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर : ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांचे गुरूवर्य जगतगुरू रेवणसिध्देश्वर महाराज यात्रा श्रावण महिन्याच्या चारही रविवारी भरते. शेवटच्या रविवारी पालखी व रथोत्सव कार्यक्रमाचे आयोजन होते. रविवारी सकाळी साडेनऊ वाजता भवानी पेठ येथील मंगल कार्यालयापासून चांदीच्या पालखीत रेवणसिध्देश्वरांची पालखी मिरवणुकिस प्रारंभ होईल. दुपारी एकच्या सुमारास रेवणसिध्देश्वर मंदिरात आगमन होईल. मंगलआरतीने समारोप होईल. यानंतर महाप्रसाद वाटप होईल. सायंकाळी साडेपाच वाजता गुरूभेट होईल. पालखी व रथाची संयुक्त मिरवणूक काढण्यात येईल.

# शहरातील बेघर नागरिकांना पाठवले आपुलकी बेघर निवारा केंद्रात

## महापालिका शहर अभियान पथकाची मोहीम

सुराज्य/सोलापूर




सोलापूर शहरातील रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर रेल्वे स्थानक, बस स्थानक, विविध धार्मिक स्थळासमोर बसलेल्या बेघर नागरिकांना महापालिकेच्या पथकाकडून कुमठा नाका येथील आपुलकी बेघर निवारा केंद्र येथे पाठविण्यात आले.

सोलापूर महानगरपालिका सोलापूर दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत व जय भारत माते सेवावृध्दी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यवाही हाती घेण्यात आली. सोलापूर शहरातील रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर रेल्वे स्थानक, बस स्थानक, मंदिर परिसर, मस्जिद व दर्गाह परिसर होम मैदान रंगभवन येथे राहणारे, फिरणारे बेघर नागरिकांना कुमठा नाका येथील आपुलकी बेघर निवारा केंद्र येथे समुपदेशन करून ॲम्ब्युलन्सद्वारे प्रथम सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी आरोग्य तपासणी करून घेण्यात आली. त्यानंतर निवारा केंद्र येथे पाठविण्यात आले. यासाठी सोलापूर महानगरपालिका शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी, बेघर निवारा केंद्र व्यवस्थापक अशोक वाघमारे, इफ्तार शेख, सोलापूर महानगरपालिका समूह संघटक वसीम शेख, सत्यजित वडावराव, नागेश क्षीरसागर, शशिकांत वाघमारे, सागर गायकवाड आणि बेघर निवारा केंद्र काळजीवाहक भरतसिंग राजपूत यांनी विशेष परिश्रम घेतले.

### ८ बेघर नागरिक निवारा केंद्रात

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर आणि उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी ८ बेघर नागरिकांना तेथे पाठविण्यात आले. याठिकाणी त्यांच्यासाठी आवश्यक त्यासुविधा उपलब्ध आहेत अशी माहिती महापालिका शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी यांनी दिली.

# एमबीए प्रवेशपूर्व परीक्षेसाठी विद्यापीठात कार्यशाळा

सुराज्य/सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाद्वारे एमबीए प्रवेशपूर्व परीक्षेसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

एमबीए अभ्यासक्रम प्रवेशासाठी तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडून प्रवेश परीक्षा दिनांक २३ ते २५ ऑगस्ट २०२२ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी विविध परीक्षा केंद्रांवरून ऑनलाइन प्रणालीद्वारे परीक्षा देणार आहे. या अनुषंगाने प्रवेश परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन दि. १९ व २० ऑगस्ट २०२२ रोजी ऑनलाइन माध्यमातून करण्यात आले होते. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी 'वरबाल ॲबिलिटी अँड रीडिंग कॉम्प्रेशन' या विषयावर डॉ. सचिन लकडे यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी 'क्वाँटीटेटीव्ह ॲप्टीट्यूड' या विषयावर प्रा. मेघा देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच रिझनिंग ॲबिलिटी या विषयावर डॉ. नवराज काळदाते यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. रश्मी दातार व डॉ. सुगंधराज कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# महाळुंगमध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

सुराज्य/श्रीपूर



महाळुंग - मायनर (ता. माळशिरस) येथे पारधी वस्ती मध्ये विश्व हिंदू परिषदेच्या वर्धापन दिन व कृष्णजन्माष्टमी निमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विश्व हिंदू परिषदेच्या पंढरपूर जिल्हा मंत्री डॉ. जयसिंह पाटील यांची उपस्थिती होती.

प्रथम पारधी समाजाचे नेते रवींद्र चव्हाण, डॉ. जयसिंह पाटील, विश्व हिंदू परिषदेचे समरसता मंचांचे बापू भोळे, सेवा विभागाचे प्रदीप कोकाटे, डॉ. नवनाथ पवार, प्रकाश केसकर यांच्या हस्ते भारतमाता, प्रभू श्रीराम व श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन केले. डॉ. पाटील यांनी शिबिर मागील संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले, येथे आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा वाटला त्या अनुषंगाने हे शिबिर घेतले. या पुढील काळात आपल्याशी सातत्याने संपर्क ठेवत आपल्या अडी अडचणी सोडवण्याचा प्रयत्न विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून केला जाईल. या प्रसंगी समरसता मंचाचे बापू भोळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. तरुणांच्या प्रश्नाकडे समाजाने लक्ष देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे, असे विहींप सेवा विभाग प्रदीप कोकाटे यांनी सांगितले. डॉ. जयसिंह पाटील व डॉ. नवनाथ पवार यांनी सुमारे ७५ जणांची तपासणी केली. यावेळी रमेश चव्हाण, बाळु चव्हाण, शंकर यमाजी चव्हाण, भारत अंबादास चव्हाण, शिवाजी काळे, सुरेश शंकर पवार, संजू दत्तू पवार, गणेश साळुंखे, ओंकार कुलकर्णी उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षा पासून आम्ही या येथे वास्तव्यास असून अनेकदा रस्ते, पाणी, या मूलभूत समस्या व कॅनॉलच्या पाण्यामुळे होणारे हाल याची तक्रार केली परंतु आम्हाला न्याय मिळाला नसल्याची खंत माजी ग्रा. पं सदस्य रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली.

# तरुण मंडळातर्फे दहीहंडी महोत्सव जल्लोषात

सुराज्य/वेळापूर : वेळापुर येथील व्यापारी पेठ येथे सुमित साखरे मित्र परिवार यांच्यावतीने व नवतरुण गणेशोत्सव मंडळाच्या मार्गदर्शनाखाली श्रीकृष्ण अष्टमीनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात करण्यात आला.

सोहळ्याला राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर, महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, मार्केट कमिटीचे माज संचालक दादासाहेब घाडगे, ओंकार माने देशमुख, राष्ट्रवादी कॉँग्रेस सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, उघडेवाडी माजी उपसरपंच तानाजी जगदाळे, युवा नेते रुद्रतेज अमरसिंह माने देशमुख, पत्रकार शिवाजी मंडले यासह सर्व मान्यवरांचा नवतरुण मंडळाचे अध्यक्ष अमोल मंडलीक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी दहीहंडी फोडण्यासाठी उपस्थित असलेले गोविंदाने डीजेच्या तालावर नाचून आनंदमय वातावरण निर्माण केले होते, दहीहंडी सोहळा पाहण्यासाठी वेळापूर मधील ग्रामस्थ, मित्र परिवार, व्यापारी वर्ग, मोठया संख्येने उपस्थित होते. रात्री आठ वाजून दहा मिनिटांनी सुमित साखरे याच्या हातून ४ थर रचून दही हंडी फोडण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी आपल्या कोषातून बाहेर पडावे : धैर्यशील

## विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचा विद्यार्थी युरोपमध्ये

सुराज्य/अकलूज




केंब्रिज बॉक्सहील लँग्वेज असेसमेंट ट्रस्टद्वारे घेतल्या जाणाऱ्या ऑक्युपेशनल इंग्लिश टेस्ट परीक्षेत शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ॲन्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूटचा बीएस्सी नर्सिंगचा विद्यार्थी अजित ढाकणे याने घवघवीत यश संपादन करत आयर्लंड या देशातील वैद्यकीय क्षेत्रात नर्सिंग ऑफिसर म्हणून निवड झालेली आहे.

विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील उपाध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांनी त्याचे व त्यांच्या पालकांचा सत्कार केला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील हे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, मी दोन-तीन वर्षांपूर्वी आपल्या म्हणालो होतो की नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी, सरकारी नोकरीची मानसिकता बदलली पाहिजे. जगभरात वैद्यकीय क्षेत्रात मोठी संधी आणि सन्मान आहे विद्यार्थ्यांनी आपल्या कोषातून बाहेर पडून त्या संधींचा फायदा घेतला पाहिजे आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी परदेशात गेले पाहिजे हे जे स्वप्न पाहिले त्याची सुरुवात होताना दिसत आहे. या गोष्टीचा मनस्वी अभिमान वाटतो

आजपर्यंत महाविद्यालयातून १०१९ विद्यार्थी पास आउट झाले आमच्या नर्सिंग महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण व उत्कृष्ट विद्यार्थी घडवण्याचे काम करत आहे यातूनच नर्सिंगचे ९९ विद्यार्थी थेट महाराष्ट्र शासनात, देशातील प्रतिष्ठित केंद्रशासनाच्या आयएमएस इन्स्टिटयूटमध्ये २ विद्यार्थी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत असे उपाध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांनी सांगितले. या प्रसंगी संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, संचालक प्रा. डॉ. विश्वनाथ आवड, व्यवस्थापन अध्यक्ष पराग गायकवाड, शिवतीर्थ हिरेमठ, विराट गोरे, रूपाली वाळके, देवेंद्र वर्दम, ज्योत्स्ना कांबळे, पुजा चौरे, रूपाली कांबळे, विष्णुपंत शिंदे, प्रशांत पांचाळ, अलविन काळे, अलिशा पारकर, सनम शेख, सुप्रिया चिंतामणी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

### सर्वांच्या मार्गदर्शनाने यश मिळाले : ढाकणे

हे माझ्य भाग्य आहे की मी, या कॉलजेचा विद्यार्थी आहे, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मार्गदर्शक शिक्षक या सर्वाच्या प्रोत्साहन दिल्याने नवनवीन गोष्टी करू शकल्याने हे यश प्राप्त करू शकलो, असे विद्यार्थी अजित ढाकण याने सांगितले.

# व्यसनमुक्त युवक संघाची १३ कि.मी. पदयात्रा

सुराज्य/वेळापूर

फलटण (ता. फलटण) येथे व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने अमृतमहोत्सव वार्षिक समारोपाच्या प्रसंगी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला १४ ऑगस्ट दुपारी ३.३० ते ७.३० या वेळेत फलटण शहरातील मनमोहन राजवाडा ते राष्ट्रबंधू राजीव दीक्षित गुरुकुल पिंपरद अशी सुमारे १३ कि.मी.ची पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेमध्ये सुमारे १,२०० तरुण, महिला, व पुरुष सहभागी झाले होते.

या पदयात्रेसाठी सोलापूर, सातारा, पुणे, नगर, सांगली, परभणी, कोल्हापूर, या भागातील व विविध तालुक्यातील तरुण युवक व युवती उपस्थित होत्या. ही पदयात्रा मुख्य बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, क्रांतिसिंह नाना पाटील चौक या ठिकाणी दोन्ही राष्ट्रपुरुष यांना वंदन करून पंढरपूरच्या दिशेने निघाली. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम्, जय हिंद, जय जवान जय किसान व देशभक्तीच्या गीताने सर्व परिसर दुमदुमून गेला. या पदयात्रेत व्यसनमुक्त युवक संघाचे संस्थापक व ज्येष्ठ कीर्तनकार युवकमित्र बंडातात्या कराडकर, यांच्यासह सर्व व्यसनमुक्त युवक संघाचे सर्व पदाधिकारी व महिला आघाडी सहभागी झाले होते. विडणी येथील सामाजिक कार्यकर्ते अष्टविनायक नर्सरीचे मालक रघुनाथ भोसले यांचे वतीने सर्वांना अल्पोपहार व दूध देण्यात आले. सुमारे १० ते १३ कि.मी. अंतर पायी चालल्यानंतर पिंपरद येथील गगनगिरी मंगलकार्यालयात समस्त ग्रामस्थांतर्फे पदयात्रेत सहभागी झालेल्याना महाप्रसाद देण्यात आला. त्यानंतर संघटनेचे मार्गदर्शक अभय भंडारी यांचे व्याख्यान झाले. पदयात्रेत फलटण ते पिंपरद या ठिकाणापर्यंत फलटण ग्रामीण पोलीस यांनी बंदोबस्ताचे काम चोख केले.

### हजारो महिला व पुरुषांचा सहभाग

# शिर्डीत संशयित दहशतवाद्याच्या आवळल्या मुसक्या

## महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथक आणि नगर पोलिसांची कारवाई

सुराज्य/नागपूर

**महाराष्ट्रातील दहशतवादी विरोधी पथक (ATS), अहमदनगर पोलीस आणि पंजाब पोलिसांनी एकत्रित मिळून एक मोठी कारवाई केली आहे. शिर्डीतून एका संशयित दहशतवाद्याला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव राजिंदर असे असून तो पंजाबमधील असल्याची माहिती समोर आली आहे. अटक करण्यात आलेल्याला महाराष्ट्र एटीएसने पंजाब पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र एटीएस आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त कारवाईत आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे.**



पंजाब पोलिसांच्या गाडीला स्फोटके लावून उडवून देण्याच्या प्रकरणात ही अटक करण्यात आली आहे. नाशिक एटीएस विभागाचे अधिकारी, अहमदनगर पोलीस आणि पंजाब पोलिसांनी एकत्रित मिळून ही कारवाई केली आहे.

अमृतसरमधील रणजित एवेन्यू परिसरात पंजाब पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक दिलबाग सिंग यांचे घर आहे. दिलबाग यांची खासगी गाडी त्यांच्या घराबाहेर उभी होती. सोमवारी रात्रीच्या सुमारास त्यांनी घराबाहेर गाडी उभी केली होती.

सकाळी ही गाडी धुण्यासाठी मुलगा आला असता त्याला काही संशयास्पद वस्तू आढळून आली. त्यानंतर त्याने याबाबतची माहिती दिलबाग यांना दिली. दिलबाग यांनी पाहिल्यावर ती बॉम्बसदृश्य वस्तू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी याची माहिती बीडीडीएस टीमला दिली.

या घटनेची माहिती मिळताच बीडीडीएस टीमने घटनास्थळी पोहोचत तो बॉम्ब निकामी केला. ती एक IED स्फोटके होती. असे म्हटले जात आहे की, कार स्टार्ट करताच बॉम्बचा स्फोट झाला असता आणि तशाप्रकारे ते सेट करण्यात आले होते.

### बॉम्बने उडवण्याचा रचलेला कट

पंजाबमधील अमृतसरमध्ये एका पोलीस कर्मचाऱ्याच्या वाहनात आयईडी (IED) स्फोटके लावून त्यांना ठार करण्याचा कट रचण्यात आला होता. गाडी धुण्यासाठी आलेल्या मुलाने वेळीच हे स्फोटक पाहिले आमि त्याबाबतची माहिती पोलिसांना दिली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. पोलिसांच्या बॉम्ब निकामी पथकाने ती स्फोटके नष्ट केली.

## संक्षिप्त वृत्त...

### कीर्तनकार इंदुरीकरांवर गावकरी संतापले



सुराज्य/बीड : आपल्या वक्तव्यांनी सतत चर्चेत असलेले प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज यांच्या पुढे अडचण निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचे कारण म्हणजे इंदुरीकर महाराजांवर गुन्हा दाखल करा अशी मागणी नेकनूरमध्ये करण्यात आली आहे. इंदुरीकर महाराजांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा या मागणीसाठी नागरिकांनी नेकनूर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. बीडमध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात आपण महाराजांवरती वेगवेगळे गुन्हे दाखल झाले पाहिजे, अशी मागमी आंदोलक नागरिक करत आहेत.

कीर्तनकार इंदुरीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी नेकनूर पोलीस ठाण्यात नागरिकांनी मोठी गर्दी केलेली आहे. या मागणीबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कळसंबर गाव येथे निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन ठेवण्यात आले होते. मात्र अचानक महाराजांनी कार्यक्रम रद्द करण्याचा आदेश दिल्यामुळे गावकऱ्यांमध्ये संताप पहायला मिळत आहे. गावकऱ्यांनी महाराजांच्या कार्यक्रमासाठी एक ते दीड लाख खर्च केला होता. यामुळे महाराजांनी अचानक कार्यक्रम रद्द केल्यामुळे महाराजांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी कळसंबर गावातील नागरिकांनी नेकनूर पोलीस स्टेशनमध्ये केली आहे.

### जगभरात मंकीपॉक्सचे टेन्शन कमी झाले

सुराज्य/नवी दिल्ली : देशासह जगभरात कोरोना व्हायरसनंतर मंकीपॉक्स व्हायरस पसरताना दिसतो आहे. मंकीपॉक्सवर आतापर्यंत कोणतीही लस किंवा औषध उपलब्ध नाही. तसंच याची ओळक करणंही कठीण होतं. या व्हायरसची ओळख करण्यासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठवावे लागत होते, पण आता मंकीपॉक्सवर पहिलं स्वदेशी निर्मित आरटीपीसीआर किट तयार करण्यात आलं आहे. ट्रान्सएशिया एर्बा बायोमेडिकल्सकडून हे मंकीपॉक्सवरील किट तयार करण्यात आलं आहे. केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञकिय सल्लागार अजय कुमार सूद यांच्याहस्ते आंध्र प्रदेशमध्ये हे ठढ-झउठ किट लॉंच करण्यात आलं. ट्रान्सएशिया एर्बा मंकीपॉक्स आरटीपीसीआर किट अतिशय संवेदनशील असून वापरण्यासही सोपं आहे. या किटच्या मदतीने संसर्ग लवकर ओळखला जाऊ शकतो असं ट्रान्सएशियाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वजीरानी यांनी सांगितलं.

### सोन्याची मागणी वाढली; भारताकडून विक्रमी आयात

सुराज्य/नवी दिल्ली : चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत, म्हणजेच एप्रिल ते जुलै या काळात सोन्याची आयात गेल्या वर्षातील याच काळाच्या तुलनेत ६.४ टक्क्यांनी वाढली आहे. यंदा एप्रिल ते जुलै या काळात १२.९ अब्ज डॉलरचे सोने आयात करण्यात आले आहे. सोन्याच्या किरकोळ मागणीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे सोन्याची आयात वाढल्याचे केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने सांगितले आहे. गेल्यावर्षी याच काळात १२ अब्ज डॉलरचे सोने आयात केले गेले होते. केवळ यावर्षीच्या जुलै महिन्याचा विचार केल्यास असे दिसून येईल की, या एका महिन्यात सोन्याची आयात जुलै २०२१च्या तुलनेत ४३.६ टक्के घसरली आहे. जुलै महिन्यात २.४ अब्ज डॉलरचे सोने आयात केले गेले आहे.

### पाली जिल्ह्यात भीषण अपघात; ६ भाविकांचा मृत्यू

नवी दिल्ली :राजस्थानच्या पाली जिल्ह्यात रामदेवरा मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या ट्रॅक्टरला भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ६ भाविकांचा मृत्यू झाला असून २० भाविक जखमी झाले आहेत. अपघातानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून तपास सुरु आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविक ट्रॅक्टर ट्रॉलीतून जैसलमेर जिल्ह्यातील रामदेवरा मंदिरात दर्शनासाठी जात होते. समोरून येणाऱ्या दुसऱ्या ट्रॉलीने ट्रॅक्टरला धडक दिली.

## दहीहंडी उत्सवात तुफान राडा

### तरूणावर कोयत्याने वार, हवेत गोळीबार

सुराज्य/पुणे

**दहीहंडीच्या जल्लोष उत्साहात असताना पुण्यात सिंहगड रोड परिसरात नाचत असताना पूर्ववैमनस्यातून सात ते आठ जणांच्या टोळक्याने एका तरुणावर धारधार शस्त्राने वार केले. तर यातील एका सराईत गुन्हेगाराने हवेत गोळीबार करून दहशत निर्माण केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री वडगाव भागात घडली. शुभम जयराज मोरे (रा. महादेव नगर वडगाव) असे जखमी झाल्याचे नाव आहे. त्याला उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**




ओंकार लोहकरे असे गोळीबार करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी रात्री सव्वासात ते साडेसातच्या सुमारास तुकाईनगर परिसरात असणाऱ्या कॅनॉल शेजारील रस्त्यावर घडली आहे. घटनेची माहिती मिळताच सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव मधील महादेव नगर येथील वेताळ मित्र मंडळ दहीहंडी उत्सवात शुभम जयराज मोरे हा त्याच्या मित्रांसोबत नाचत होता.

यावेळी आरोपी चेतन ढेबे, ओंकार लोहकरे, अनुराग चांदणे, ज्ञानेश्वर जाधव, बाला धेबे, साहिल उघडे, वैभव साबळे व त्यांचे सात ते आठ मित्र यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून मोरे याला मारहाण केली. यावेळी आरोपी लोहकरे याने त्याच्या जवळील पिस्तूलने हवेत गोळीबार केला. त्यानंतर चेतन ढेबे याने मोरे याच्या मानेवर धारधार शस्त्राने वार करून जखमी केले. आरोपींनी मारहाण करत या भागात दहशत निर्माण केली.

याप्रकरणी सिंहगड रोड पोलिसांनी यातील आरोपी बाला ढेबे याच्यासह त्याच्या काही साथीदारांना तत्काळ पाठलाग करून पकडले अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश संखे यांनी दिली.

## पोलीस अधीक्षकांची गाडी रोखून केली अरेरावी

### टोल नाक्यावर घडला धक्कादायक प्रकार

सुराज्य/नाशिक

**नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांची गाडी अडवून त्यांच्यासोबत हुज्जत घालत अरेरावी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पिंपळगाव बसवंत टोलनाक्यावर शुक्रवारी ही घटना घडली आहे. याबाबत पिंपळगाव पोलीस ठाण्यात टोलनाका कर्मचाऱ्यांच्या विरोधात रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांची गाडी पिंपळगावहून नाशिकच्या दिशेने



जात असताना टोल नाक्याच्या लेन जवळ आल्यानंतर स्वतंत्र लेन बंद असल्याने त्यांनी गाडी दुसऱ्या लेनमध्ये नेली. परंतु १५ ते २० मिनिटं होऊनही लेन ओपन होत नसल्याने पोलीस अधीक्षक यांनी याबाबत विचारणा केली. तेव्हा कर्मचाऱ्यांनी गाडी जाऊ दिली नाही आणि पोलीस अधीक्षकांशी हुज्जत घालत अरेरावी केली. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणी पिंपळगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधला आणि संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचा सूचना दिल्या.

पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत संबंधित कर्मचाऱ्याला ताब्यात घेतले. दरम्यान कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून प्रचलित असलेले पोलीस अधीक्षक सचिन पाटील मालेगाव येथून शासकीय कामकाज आटोपून परतत होते. त्यावेळी पिंपळगाव टोल नाक्यावर हा सर्व प्रकार घडला आहे. याबाबत आता पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपळगाव टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांच्या मुजोरीला आवर घालण्यासाठी आता कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## ... आता कोल्हापुरात महाभारत होणार



**भाजप खासदाराचा गंभीर इशारा**

सुराज्य/कोल्हापूर : भारतीय जनता पक्ष आणि खासदार धनंजय महाडिक युवाशक्तीच्यावतीने दसरा चौकात आयोजित केलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडी स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी त्यांनी आमदार सतेज पाटील यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. तीन लाखाच्या या दहीहंडीचा मानकरी संघर्ष ग्रुप ठरला. प्रचंड उत्साह आणि हजारो तरुणांच्या गर्दीत आणि नृत्य, डीजेच्या धमाक्यात ही स्पर्धा झाली. त्याचे उद्घाटन माजी आमदार महादेवराव महाडिक, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, आमदार प्रकाश आवाडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

राजकारणात कूट आणि कपट नीतीने आमचं ठरलय म्हणत लोकसभा निवडणुकीत त्यांनी माझा अभिमन्यू करून घात केला. त्यानंतर अडीच वर्षात मला प्रचंड त्रास दिला. माझे उद्योग, शिक्षण संस्था बंद पाडण्याचा प्रयत्न केला. माझ्या साखर कारखान्याचे सभासद कमी केले. सत्ता हे चक्र असते. आज सूर्य मावळला तर उद्या नक्की उगवत असतो. जेव्हा आमची सत्ता येईल, तेव्हा तुम्हाला झेपणार नाही, असा इशारा आपण यापूर्वीच दिला होता. आता आमची सत्ता आली आहे. तुमच्यासारखं कूट कपट नीतीने आम्ही राजकारण करणार नाही. पण वीर योद्धे ज्याप्रमाणे लढतात तसेच आमची लढाई सुरू राहील. यातून महाभारत होईलच आणि वाईटाचा नाश होऊन चांगला काळ जिल्ह्यात सुरू होईल, असे म्हणत खासदार धनंजय महाडिक यांनी सतेज पाटील यांना गंभीर इशारा दिला आहे.

## शिंदे सरकारकडून खडसे यांना धक्का

सुराज्य/जळगाव : जिल्हा दूध संघातील एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाताई खडसे यांच्या अध्यक्षतेखाली असलेले संचालक मंडळ बरखास्त करत शिंदे सरकारने एकनाथ खडसे यांना मोठा धक्का दिला होता व चौकशी समिती देखील समिती देखील नियुक्त करण्यात आली होती.

दरम्यान चौकशीत दहा कोटी रुपयांचा निधी शासनाची कुठलीही परवानगी न घेता संचालक मंडळांनी परस्पर खर्च केल्याचा धक्कादायक प्रकार चौकशीत उघड झाल्याने संचालक मंडळ विरुद्ध कारवाई करण्याचे शासनाचे उपसचिव नि. भा. मराळे यांनी विभागीय सह निबंधकांना दिले आहे. त्यामुळे एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्या देखील अडचणीत वाढ झाली आहे.

जळगाव जिल्हा दूध संघाच्या मुख्य दुग्धशाळा विस्तारीकरण व आधुनिकीकरणासह दुग्धजन्य पदार्थ विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी विहीत डीपीआरनुसार काम न केल्याने तब्बल ९ कोटी ९७ लाख रूपयांची अनियमितता आढळून आली आहे. राज्याचे सहकारी संस्था (दुग्ध) यांच्या उपसचिवांनी याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिल्यामुळे एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाताई खडसे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

## 'आमच्या नादाला लागाल तर ठोकून काढू'



सुराज्य/नगर : 'काही लोकांना वाटतंय सरकार बदललंय, त्यामुळे त्यांचा उत्साह वाढला आहे. सरकार बदलले असले तरी आमदार बदललेला नाही. आमदार मीच आहे. आमच्या नादाला लागाल तर ठोकून काढू असा सज्जड दमच कोपरगावचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आशुतोष काळे यांनी विरोधकांना दिला आहे.'

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदाराने दिला दम

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप कार्यकर्ते एकमेकांविरोधात उभे ठाकले होते. दहीहंडी निमित्त राष्ट्रवादीचे आमदार आशुतोष काळे यांच्या समर्थकांमार्फत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उत्सवाची स्वागत कमान उभारण्यात येत असल्याने भाजपच्या (कोल्हे गट) कार्यकर्त्यांनी त्याला विरोध दर्शविला. यातून मध्यरात्रीच्या सुमारास दोन्ही गटाचे शेकडो कार्यकर्ते आमने-सामने आले.

काळे गटाकडून आमदार आशुतोष काळे आणि राष्ट्रवादीच्या समर्थनार्थ तर कोल्हे गटाकडून भाजप आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे पुत्र विवेक कोल्हे यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली. मध्यरात्रीच्या सुमारास कोपरगाव शहरात दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांविरोधात आक्रमक झाले होते. शेवटी पोलिसांना शीघ्र कृतीदलाच्या मदतीने जमाव पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज करावा लागला होता. मात्र गेली तीन दिवस कोपरगाव शहरात याचे पडसाद दिसून आले.

## अंमली पदार्थ बाळगणाऱ्या परदेशी नागरिकाला पकडले

सुराज्य/पुणे : :अमली पदार्थ बाळगणाऱ्या परदेशी नागरिकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून चार लाख ५७ हजारांचे अमली पदार्थ, मोबाइल संच असा पाच लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नसबुग इस्माइल (वय २३, सध्या रा. औंध, मूळ रा. युगांडा ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. खडकी बाजार परिसरात अमली पदार्थविरोधी पथक गस्त घालत होते. त्या वेळी एक परदेशी नागरिक अमली पदार्थ विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३२ ग्रॅम मेफेड्रोन, ४ मिलीग्रॅम मेथेक्युलॉन असे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

## राज्यासमोर पुन्हा नवे संकट

### स्वाइन फ्लूने तब्बल ११ जणांचा बळी

नाशिक : करोना संसर्गाच्या आपत्तीनंतर नाशिककरांसमोर आता स्वाइन फ्लूचे संकट उभे ठाकले आहे. गेल्या १५ दिवसांत स्वाइन फ्लूने शहरासह जिल्ह्यात तब्बल ११ जणांचा बळी घेतल्याने धोका वाढला आहे. शहरातील स्वाइन फ्लू बाधितांचा आकडाही ९४वर पोहचला आहे. करोना, डेंग्यू व स्वाइन फ्लू अशा तिहेरी संकटांमुळे नाशिक 'अतिदक्षतेच्या इशाऱ्या'वर आले आहे.

नाशिकमध्ये करोना आणि डेंग्यूपेक्षा स्वाइन फ्लूचा धोका अधिक वाढला असून, गुरुवारी शहरात आणखी दोघांचा मृत्यू झाला. शहरातील स्वाइन फ्लूच्या बळींचा आकडा तीनवर पोहचला असताना जिल्ह्यातील एकूण बळींचा आकडा हा ११वर पोहचला आहे. जिल्ह्यातील ११ बळींमध्ये पालिका हद्दीतील तीन जणांचा समावेश असून, ग्रामीण भागातील चार जणांचा बळी गेला आहे. अहमदनगरमधील तियांचा, तर पालघरमधील एका रुग्णाचा नाशिकमध्ये उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

## आनंद मठात जाऊन ठाकरे यांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

सुराज्य/ठाणे

महाविकास आघाडीच्या उद्धव ठाकरे सरकारमधून बंड पुकारल्यानंतर ठाण्यातील हजारो शिवसैनिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी समर्थन देत एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दर्शवला होता. त्यामुळे ठाण्यात शिवसेनेला भलेमोठे खिंडार पडलेले पाहायला मिळाले.

या चढाओढीत शिंदे गटाने संपूर्ण ठाण्याचा ताबा घेतला. आनंद मठ देखील शिंदे गटाच्या ताब्यात होते. तरीही काही ठाकरे समर्थक एकनाथ शिंदे यांच्या बंडाविरोधे ठाम राहून ठाकरे सरकारच्या बाजूने उभे होते. मात्र या घटनेनंतर ठाण्यात शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यात



चढाओढ सुरू झाल्याचे दिसून आले. या चढाओढीत धर्मवीर आनंद दिघे यांचे दोन शिष्य, एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर दुसरीकडे खासदार राजन विचारे आमने-सामने होते.

या संपूर्ण घटनेनंतर ठाण्यात शिवसेनेच्या ठाकरे गटाचा एकही बडा नेता ठाण्यात आला नव्हता. मात्र दहीहंडीच्या निमित्ताने ठाण्यातील राजन विचारे यांच्या आनंद चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित महादहीहंडीला शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी नुसती उपस्थिती न दर्शवता ठाण्यात पोहचताच आदित्य ठाकरे हे गाडीतून उतरून पदयात्रा करत थेट धर्मवीर आनंद दिघे यांच्या निवासस्थानी म्हणजेच आनंद मठ या ठिकाणी पोहचले.

## उधारीची कंपनी ३८० कोटींची बनली मालक

सुराज्य/नवी दिल्ली

**एन. आर. नारायण मूर्ती हे नाव आज देशासह जगभरात प्रसिद्ध आहे. एक स्वप्न, उधारीवर घेतलेल्या १० हजार रुपयांसह व्यवसायाची सुरुवात केलेले नारायण मूर्ती आज जगातील मोठ्या उद्योगपतींमध्ये सामिल आहेत. त्यांची कंपनी इन्फोसिस जगभरात व्यवहार करते आहे आणि लाखो लोकांना रोजगारही देत आहे.**

एन. आर. नारायण मूर्ती आज त्यांचा ७६व्या वाढदिवस आहे. एखाद्या व्यक्तीने अतिशय जिद्दीने काही करायचं ठरवलं, तर कोणतीही गोष्ट शक्य आहे. हे वाक्य देशातील दुसरी सर्वात मोठी सॉफ्टवेअर कंपनी इन्फोसिसचे सह-संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांना तंतोतंत लागू आहे. अतिशय साधेपणाने जीवन जगणाऱ्या नारायण मूर्ती यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर स्वत:चं नशीब बदललं आणि आज अनेकांसाठी ते प्रेरणा ठरत आहेत. त्यांच्या या यशामागे मोठा संघर्षही आहे.

इन्फोसिसचे सह-संस्थापक एन. आर. नारायणमूर्ती यांचा जन्म २० ऑगस्ट १९४६ मध्ये कर्नाटकातील



सिद्लाघत्तामध्ये झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले नारायण मूर्ती ८ भावंडांमध्ये पाचव्या नंबरवर होते. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी १९६७ मध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, मैसूर यूनिव्हर्सिटीमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर १९६९ मध्ये आयआयटी कानपूरमधून एमटेक केलं. त्यानंतर त्यांनी १९७० च्या अखेरीस पुण्याच्या पाटनी कम्प्युटर्समध्ये असिस्टंट मॅनेजर म्हणून नोकरीची सुरुवात केली.

एन. आर. नारायण मूर्ती यांचा विवाह सुधा मूर्ती यांच्यासह १० फेब्रुवारी १९७८ रोजी बेंगळुरूत झाला.

लग्नानंतरच त्यांच्या आयुष्यात मोठे बदल होण्यास सुरुवात झाली. लग्नानंतर त्यांनी आपली कंपनी सुरू करण्याचा विचार केला आणि हीच जिद्द ठेवली. त्यांनी सर्वात आधी सॉफ्टरोनिक्स नावाने कंपनी सुरू केली, पण ती यशस्वी झाली नाही.

यानंतरही नारायण मूर्ती आपल्या जिद्दीवर अडून होते. याच जिद्दीतून, मेहनतीतून त्यांनी सर्वात मोठी कंपनी उभारली.

CMYK




# 'रोडकिंग' का नकोसे झाले?


**हर्षल बागल**

केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांना देशात रोडकिंग म्हणून ओळखले जाते. गडकरी यांनी देशात रस्त्यांचे न भूतो,न भविष्यती, असे जाळे विणले. एक स्वच्छ निष्कलंक राजकारणी ते यशस्वी रस्ते वाहतूक मंत्री अशी त्यांची ओळख आहे. इतिहासाच्या सत्तर वर्षात एकाही रस्ते वाहतूक मंत्र्याला जे जमले नाही, ते त्यांनी करुन दाखवले आहे.पण, अलिकडेच भाजपाच्या संसदीय कार्यकारणीतून त्यांचे नाव वगळून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश करण्याचा हा प्रकार म्हणजे गडकरी यांचे खच्चीकरण करण्यासारखाच आहे. गडकरी यांचे नाव संसदीय कार्यकारणीमधून 'आऊट' होणे व फडणवीस यांचे संसदीय कार्यकारणीत नाव 'इन' होणे हे भाजपातील नव्या राजकीय वर्चस्ववादाच्या संघर्षाला फोडणी टाकणारा अध्याय असेल.

एकेकाळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवलेले केंद्रीय गडकरी यांचा भाजपाच्या मुख्य संसदीय कार्यकारणीत स्थान मिळाले नाही की दिले गेले नाही, हा संशोधनाचा विषय आहे. पण गडकरींसारखा दूरदृष्टीचा नेता, एक स्पष्टवक्ता आणि कट्टर संघ विचारांचा नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. भाजपात अलीकडच्या काही वर्षात संघ विचाराने चालणाऱ्या नेत्यांची फार उणिव भासू लागली आहे. 'मी म्हणेन तेच खरे' असा एककलमी कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्ली ते गल्ली राबवला आहे. संघाला अपेक्षित असलेला सत्ताकारभार होत नाही. सगळे काही सत्ताकारण होत आहे. अशा राजकारणाचा कंटाळा आला आहे,असे स्पष्ट वक्तव्य गडकरींनी अनेकवेळा केले आहे. आपण ज्या मातृसंस्थेतून आलो, त्याबद्दलची ही त्यांची तळमळ त्यात दिसून येते. अलीकडे संघ देखील भाजपातील हुकूमशाहीला कंटाळला की काय? असे चित्र दिसत आहे. कारण भाजपाच्या संसदीय मुख्य कार्यकारणीत कट्टर संघ विचाराच्या एकाही नेत्याचा समावेश नसल्याने संघ व भाजपात दोन मतप्रवाह होत आहेत, हे दिसत आहे.

### पंख छाटण्याचे उद्योग पध्दतशीर सुरु

अलीकडे प्रसारमाध्यमांतून गडकरी प्रधनमंत्री होतील अशा बातम्या येत होत्या. गडकरी यांच्या मागून आलेले फडणवीस यांना केंद्रीय कार्यकारणीत स्थान मिळते. हा प्रकार गडकरी यांना डिवचण्याचाच आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार ऊलथापालथ करण्याचे बक्षिस म्हणून फडणवीस यांना संसदीय कार्यकारणीत स्थान मिळाले हे तितकेच खरे आहे. मोदी यांच्या नंतर प्रधानमंत्रीपदाचे उमेदवार गडकरी यांना अनेकांनी ग्रहीत धरले होते पण गडकरी यांचा वाटेत काटा कशाला असे म्हणत आतापासूनच गडकरी यांचे पंख छाटण्याचे उद्योग पध्दतशीर सुरु आहे.



# झेडपीसाठी घरंदाज आणि अपक्षांचा आटापिटा

**बळीराम सर्वगोड**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या नुकत्याच होणाऱ्या निवडणुकीत अपक्षांची गर्दी दिसत असून तिकीट मिळो ना मिळो निवडणुकीला आम्ही उभारणारच असे दंड थोपटून काही अपक्ष मंडळी तयारीला लागले असून त्यांच्या बरोबरीला घराणेशाहीचेही उमेदवार तेवढ्याच ताकदीनिशी तयारीला लागले असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीबरोबरच पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे इकडे नाही तर तिकडे असेही काही इच्छुक मंडळी तसेच माजी आमदारांमध्ये या संदर्भात चर्चा होत आहे. परवा जाहीर झालेल्या आरक्षणात यावरून अनेक उमेदवारांना जंग जंग पछाडले होते मात्र मध्येच त्याला कलाटणी मिळाली आहे. त्यामुळे इच्छुक सदस्यांमध्ये नाराजी पसरली आहे तरीसुद्धा असे असताना काही सदस्य असेही म्हणत आहेत की, आपल्या गणात किंवा गटात आरक्षण पडले तर चांगलेच परंतु तसे झाले नाही तर आपण इकडे ना तिकडे अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारच असा चंग बांधला जात असल्याचे चित्र जिल्ह्यामध्ये दिसत आहे. जिल्हा परिषदेचे आरक्षण तसेच पंचायत समितीची आरक्षण सोडत २८ जुलै रोजी काढण्यात आली होती मात्र ही सोडत रद्द करून पुन्हा एकदा त्यात राज्य सरकारने बदल करण्याचे ठरविले असल्याने आता २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार त्या त्या आराखड्याप्रमाणे निवडणूक घेण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे झेडपीच्या आणि पंचायत समितीच्या जागा कमी होणार आहेत. सध्या जि प च्या निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. त्यातच जिल्ह्यातील अनेक नेतेमंडळी आपापल्या मुलांना नातेवाईकांना या निवडणुकीमध्ये उतरविण्याच्या मनस्थितीत आहेत. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे उत्तर तालुक्यामध्ये राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांचे चिरंजीव किंवा त्यांच्या सुनबाई यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमध्ये उभे करण्याची तयारी काकांकडून सुरू असल्याचे दिसत आहेत तर माजी आमदार दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने यांच्यासाठीही दिलीप माने यांनी निवडणुकीत निवडून येण्यासाठी चंग बांधण्याचे दिसून येत आहे. अशाच प्रकारचे चित्र संपूर्ण जिल्ह्यामध्ये दिसत आहे. आमदार सुभाष देशमुख हेही आपल्या चिरंजीवास सुरक्षित मतदारसंघ शोधण्याच्या तयारीत आहेत तर दक्षिण तालुक्यामध्येच रतिकांत पाटील यांचे चिरंजीव अमर पाटील हेही विद्यमान सदस्य आहेतच परंतु ते पुन्हा आपले नशीब अजमावण्याच्या जय्यत तयारीत आहेत. अक्कलकोट तालुक्यातील आमदार सिद्धाराम म्हेत्रे हे सुद्धा आपली मुलगी शितल किंवा मुलगा शिवराज यांच्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे तसेच याच तालुक्यातून आमदार सचिन कल्याणशेट्टी हे देखील आपले भाऊ सागर कल्याणशेट्टी यांनाही या निवडणुकीमध्ये उभे करण्याच्या तयारी दिसत आहेत तसेच माढा तालुक्यातून सुद्धा यावेळी वेगळे गणिते दिसत आहेत. विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजित शिंदे हे सुद्धा पुन्हा एकदा आपले नशीब आजमावण्याच्या तया रीत आहेत तसेच बार्शी येथील आमदार राजेंद्र राऊत हे सुद्धा आपले चिरंजीव रणजित राऊत यांच्यासाठी प्रयत्नशील आहेत. सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील हे आपल्या मुलांसाठी तेथून प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे अशाच प्रकारचे चित्र संपूर्ण जिल्हाभर दिसत येत असून घराणेशाही यावेळेस जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येणार असल्याचे एकंदरीत चित्र दिसत आहे तसेच तिकीट मिळो ना मिळो पण आम्ही निवडणूक लढवून जिल्हा परिषदेमध्ये पुन्हा सदस्य म्हणून येणारच असेही काही माजी सदस्यांनी चंग बांधायचे दिसून येत आहे.२६ ऑगस्टच्या सोडतीत नेमके काय होणार? याविषयी उत्सुकता लागून आहे.





# परिचारकांच्या विरोधात विरोधक खरंच सक्षम आहेत?

**सुरज सरवदे**

पंढरपूर नगरपालिका तसेच जिल्हापरिषद, पंचायत समितीच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. पंढरपूर नगरपालिकेवर माजी आमदार प्रशांत परिचारक गटाची एकहाती सत्ता आहे. तसेच जिल्हापरिषद, पंचायत समितीमध्ये मजबूत पकड आहे. अशा परिस्थितीत परिचारक गटाला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकात विरोध करणारे विरोधक किती सक्षम आहेत? असा प्रश्न निर्माण होत आहे.

स्व. आमदार भारत भालके यांच्या नेतृत्वाखाली २०११ साली पंढरपूर नगरपालिकेवर सत्ता मिळवली मात्र सत्ता जास्त जास्त काळ टिकली नाही. त्यावेळी भालके गटाचे काही नगरसेवक फोडून नागेश भोसले यांनी सत्तांतर केले. आणि भालके गटाची सत्ता अडीच वर्षांतच संपुष्टात आणली.

पंढरपूर नगरपालिकेवर २०१६ मध्ये परिचारक गटाने पुन्हा सत्ता संपादन केली. भालके गटाला केवळ ७-८ नगरसेवक निवडून आणता आले. अशीच परिस्थिती जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मध्ये होती. भोसे गट सोडला तर परिचारक विरोधकांना विजय मिळवता आला नाही. सध्या परिचारक विरोधात भालके-काळे आणि मनसेचे नेते दिलीप धोत्रे एकत्र येऊन समविचारी आघाडी करून निवडणूक लढवणार आहेत.

समविचारी आघाडीच्या नेत्यांची दोन बैठका देखील झाल्या आहेत. मात्र विठ्ठलचे चेअरमन अभिजित पाटील आणि डॉ बी पी रोंगे यांना दोन्ही बैठकांचे निमंत्रण देण्यात आले नव्हते. यापूर्वी भालके यांनी परिचारकांच्या विरोधात समविचारी नेत्यांना एकत्र केले होते. आता स्व. भारत भालके नाहीत त्यांच्या जागी दिलीप धोत्रे हे समविचारी आघाडीचे नेतृत्व करताना पाहायला मिळत आहे. विठ्ठल करखान्याच्या निवडणुकीत पाटील आणि डॉ.रोंगे यांनी भालके-काळे-धोत्रे यांच्या पॅनेलचा पराभव केला आहे. त्यामुळे पराभूत समविचारी आघाडी परिचारकांना कशी टक्कर देणार? हे पाहणे गरजेचे ठरणार आहे.


### परिचारक विरुद्ध पाटील सामना रंगणार

परिचारक यांचा पंढरपूर आणि तालुक्यामध्ये मोठा गट आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर वर्चस्व आहे. असे असताना अभिजित पाटील आणि डॉ. बी पी रोंगे यांना वगळून समविचारी आघाडी बैठका घेत आहेत. स्वतःची राजकीय पार्श्वभूमी नसताना अभिजित पाटील यांनी विठ्ठल कारखाना ताब्यात घेतल्यामुळे त्यांच्या रूपाने तालुक्याला तरुण नेतृत्व मिळाले आहे. विठ्ठलच्या विजयी सभेत अभिजित पाटील यांनी परिचारक यांच्या विरुद्ध दंड थोपटले होते.त्यामुळे परिचारक गटाला अभिजित पाटील हे टक्कर देऊ शकतात असे बोलले जात आहे.



# दोन वर्षांनी प्रकटले, लोकांना आश्चर्य वाटले!

**उल्हास पाटील**



माढा लोकसभेचे भारतीय जनता पार्टीचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर माढा तालुक्यात दोन वर्षा नंतर प्रकट झाले आणि सर्व पदाधिकारी नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले गेले. अनेक नागरिकांना तर खासदार आले असल्याचे विश्वास बसला नाही. तर शहरातील पत्रकारांना दूर ठेवून बैठका घेतल्या गेल्यामुळे सर्व आलबेल असल्याचे चित्र दाखवले जात आहे. प्रारंभी एक वर्ष खासदार मतदारसंघात फिरले होते. त्यानंतर खासदार घरी बसू लागले.

नागरिकांच्या समस्या काही तक्रारी व कामे असल्यास १०० किलोमीटर प्रवास करून खासदारांचे घर गाठावे लागत आहे. नागरिकांच्या समस्यासाठी खासदारांनी माढा तालुक्यामध्ये ऑफिस सुरू करणार असल्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप तालुक्यात खासदारांचे ऑफिस झाले नसल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये निराशा पसरली आहे. १८ ऑगस्ट रोजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा माढा तालुका दौरा नियोजित झाला. मात्र, गुपचूप दौरा होतो की काय? अशी परिस्थिती दिसत होती. मात्र नागरिकांना कोणत्या ना कोणत्या कारणाने खासदार येणार आल्याचे समजले व कुर्डूवाडी पंचायत समितीच्या सभागृहामध्ये खासदाराने अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये नागरिकांनी समस्यांचा पाढाच वाचला त्यामध्ये इतका गदारोळ झाला की, पोलिसांना हस्तक्षेप करू नागरिकांना शांत बसण्यास भाग पाडले होते. यामुळे खासदारांच्या विरोधात नागरिकांचा रोष स्पष्ट दिसून आला. शुक्रवारी माढा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी मोजक्याच पदाधिकाऱ्यांना बैठकीचा निरोप गेल्याचे बोलले जात आहे. तर खासदार किती वाजता बैठक घेणार आहेत याची माहिती अनेक कार्यकर्त्यांनी शेवटपर्यंत नव्हती.

### खासदारांवर पदाधिकारी नाराज

भारतीय जनता पार्टीचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा गेल्या दोन वर्षापासून माढा तालुक्यात संपर्क व संवाद नसल्याने पदाधिकारी खासदारांच्या कामकाजावर नाराज असल्याचे बोलले जात आहे. खासदार आल्यानंतर औपचारिक औपचारिक स्वागत करायचे म्हणून केले मात्र चेहऱ्यावर निराशा दिसत होती. शहरात शहराध्यक्ष निवडून अनेक दिवस झाले तरी शहर कार्यकारणी निवडीसाठी माणूस मिळत नसल्यामुळे कार्यकारणी निवड झाली नसल्याची चर्चा होत असल्याने अखेर खासदार आल्यानंतर शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली. मात्र, कुर्डूवाडीच्या नागरिकांच्या विविध प्रश्नाकडे शहर पदाधिकारी मात्र अद्याप शांत बसून असल्याचे चित्र दिसत आहे.



# घड्याळाची टिकटिक नव्हे, तर धोक्याची घंटाच...



**दीपक शेळके**



सोलापूर शहरामध्ये एमआयएम पक्षाची मुहूर्तमेढ रोवत पक्षाला उभारी देणारे पालिकेत डझनभर नगसेवक निवडून आणण्याची किमिया घडवणारे तौफिक शेख यांनी मोठे शक्ती प्रदर्शन करत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत सहा नगरसेवकांसमवेत हाती घड्याळ बांधत एमआयएमच्या पतंगाची दोरी कट केली. आता शेख यांच्यासह सहा नगरसेवकांच्या हाती घड्याळाची टिकटिक चालू झाल्याने भविष्यकाळात शहर मध्य मतदार संघामध्ये राष्ट्रवादीचे संभाव्य उमेदवार म्हणून तौफीक शेख यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यामुळे काँग्रेसचे आमदार प्रणिती शिंदे आणि एमआयएम पक्षाकडून शहर मध्यमध्ये इच्छुक असलेले फारूख शाब्दी यांच्यासाठी धोक्याची घंटाच असल्याचे बोलले जात आहे.

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमआयएम पक्षाला शहरात मोठे भगदाड पडले आहे. माजी शहराध्यक्ष तौफिक शेखसह सहा नगरसेवकांनी एमआयएमचे पतंग सोडून हाती राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले आहे. गत पालिकेच्या निवडणुकीत शेख यांच्या नेतृत्वाखाली एमआयएम पक्षाने सर्वांनाच धक्का देत तब्बल ९ नगरसेवक निवडून आणले होते. त्यामुळे सोलापुरात एमआयएम पक्षाची चांगलीच हवा झाली होती. सत्ताधारी पक्षाच्या विरोधात इतर पक्षांबरोबर सलगी करत विषय समितीचे सभापतीपद देखील मिळवले होते. मात्र, दरम्यानच्या काळात तौफिक शेख यांना अटक झाली होती. या पडत्या काळात एमआयएम पक्षाने साथ न दिल्याने पक्षावर ते नाराज झाले. सहा नगसेवकांना घेऊन वेगळी चूल पालिकेत मांडली. त्यांच्याकडे असलेले शहराध्यक्षपद देखील काढण्यात आले. २०१९ च्या निवडणुकीत त्यांना डावलत फारुख शाब्दी यांना उमेदवारी दिली. यापूर्वी झालेल्या शहरमध्ये विधानसभा मतदारसंघातून त्यांनी काँग्रेस, शिवसेना भाजपाला चांगली टक्कर देत एमआयएमची ताकद वाढवत दोन नंबर पसंतीची मते मिळवली होती. तरी देखील त्यांना पक्षाकडून सातत्याने डावलले जात असल्याने ते पक्षावर नाराज होते आणि इथूनच त्यांनी वेगळी चूल मांडण्याचा विचार केला.त्यावेळी राज्यामध्ये महाआघाडीचे सरकार होते. राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना यांची महाआघाडीची सत्ता होती. त्या काळात त्यांनी राष्ट्रीवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन राष्ट्रवादी प्रवेश निश्चित केला मात्र अधिकृत प्रवेश झाला नव्हता. तरी देखील कामाला लागा या शरद पवारांच्या आदेशानुसार तोफिक शेख आपल्या सहा नगरसेवकांसह शहर राष्ट्रवादीच्या शहर पदाधिकाऱ्यांच्या खांद्याला खांद्याला लावून राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यक्रमात आणि आंदोलनात हिरीरीने सहभागी झाले. दरम्यानच्या काळात राज्यातील महाआघाडीचे सरकार पायउतार झाले एकनाथ शिंदे गट आणि भाजपाने पुन्हा सत्ता स्थापन केली.

त्यामुळे राष्ट्रवादी प्रवेश होणार की नाही याबाबत शहरांमध्ये उलट सुलट चर्चा झाल्या मात्र राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत तौफिक शेख यांनी आपल्या सहा समर्थक नगरसेवकांसह राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी प्रवेश करताना शेख यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले. त्यांच्या समवेत मध्य मतदारसंघातील आरपीआयचे पीजी ग्रुपचे प्रमोद गायकवाड यांनी देखील राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. असंख्य कार्यकर्त्यांसह शेख यांनी आपल्या राष्ट्रवादी प्रवेशावेळी केलेले मोठे शक्तिप्रदर्शन शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीचे पडघम असल्याचे बोलले जात आहे त्यामुळे विद्यमान आ. प्रणिती शिंदे तसेच या भागातून एमआयएम पक्षाचे संभाव्य उमेदवार समजले जाणारे फारुख शाब्दी यांच्यासाठी हे शक्तिप्रदर्शन धोक्याची घंटा मानली जात आहे.

### पुन्हा कडवी लढत...

तौफिक यांच्या राष्ट्रवादीत प्रवेशामुळे पालिका आणि विधानसभेच्या निवडणुकीत मुस्लिम मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे. मत विभाजनाचा फायदा राष्ट्रवादीला होईल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे संख्याबळ वाढत जाऊन विधानसभा निवडणुकीत देखील मुस्लिम मते निर्णय ठरण्याची शक्यता आहे. कारण शहर मध्यमध्ये प्रणिती शिंदे, फारूख शाब्दी आणि तौफिक शेख या तिघांमध्ये पुन्हा कड़वी लढत होण्याची शक्यता आहे.


### खरादी राष्ट्रवादीच्या वाटेवर


तौफिक शेख आणि नगरसेवकांच्या प्रवेशानंतर आता एमआयएमचे पालिकेतील माजी गटनेते रियाज खरादी हे देखील राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत. त्यांनी अजित पवार, शरद पवार यांची भेट घेऊन राष्ट्रवादी प्रवेश निश्चित केल्याचे बोलले जात आहे त्यामुळे भविष्यात ज्या जोमाने महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर पक्ष उभारून आला होता, त्याच महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची होणारी वाताहात आणि पक्ष वाढीचे मोठे आव्हान शहराध्यक्ष फारुख शाब्दी यांना पेलावे लागणार आहे.



# निवडणूक प्रकिया थांबल्याने इच्छुकांचा हिरमोड

**डी.एस.गायकवाड**





जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या गट व गण रचनेनंतर आरक्षण ही जाहीर झाले होते यामध्ये अनेक जणांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी देखील केली होती पण सरकार बदलताच सर्व प्रक्रिया थांबवल्याने व गट रचना गण रचना २०१७ च्या धर्तीवर होणार असल्याने इच्छुकांचा हाफमोड झाला असून अनेक जणांना यामुळे पुन्हा पालवी फुटू लागल्याचे दिसत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्याची सर्वसामान्य कार्यकर्त्यांची खूप इच्छा असते. या निवडणुकीच्या माध्यमातूनच कार्यकर्त्याला उभारी मिळू शकते यासाठी आमदार खासदारकीच्या निवडणुकीपेक्षाही सामान्य कार्यकर्त्यांच्या नजरा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लागलेल्या असतात. आमदार खासदार होता येणार नाही किमान मिनी मंत्रालय तरी गाठू अशा अपेक्षा बाळगून अनेक जण असतात. यासाठी त्यांची सदैव तयारी चालू असलेली दिसते. पण ऐनकेन प्रकारे या निवडणुका लांबत चालल्याने आहे कार्यकर्त्यांची निराशा होताना दिसते आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी अपेक्षित तर कुठे अनपेक्षित आरक्षण पडल्याने कही खुशी कही गम अशी परिस्थिती पाहायला मिळत होती. कैक ठिकाणी अनेक जणांनी तयारी करून सुद्धा अपेक्षित आरक्षण न पडल्याने त्यांचा अपेक्षाभंग झाला होता. त्यामुळे त्यांनी काढता पाय घेतलेला दिसत होता तर काय ठिकाणी हवे ते आरक्षण पडल्याने अनेक जणांनी तयारी देखील सुरू केली होती मात्र शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर सदर निर्णय प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली यामुळे अनेक जणांचा हाफ मोड झाला तर अनेक जणांना अजूनही मिनी मंत्रालय गाठण्याची आशा वाटू लागली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक पक्ष ताकदीने उतरणार असून ताकदीच्याच कार्यकर्त्यांना मैदानात उतरवणार आहेत. मात्र आता सर्वांनाच प्रतीक्षा करावी लागणार आहे. सरकारचा पुढील निर्णय येईपर्यंत अनेक जणांनी शांत राहणेच पसंत केलेले दिसत आहे. तर काहीजण अजूनही सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या उमेदवारीची पेरणी करताना दिसत आहेत.

चर्चेत राहून आपल्या नावाला पुढे पक्ष उमेदवारी देऊन न्याय देईल या भावनेपोटी अजूनही काहींनी मैदान सोडलेले दिसत नाही. त्यामुळे कधी का होईना या निवडणुका रंगतदार होणार आहेत. लगे रहो म्हणत अनेक जण अजूनही मैदान सोडताना दिसत नाहीत. सध्याच्या घडीला तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने अनेक जण शांत झालेले दिसत आहेत. ही शांतता वांदळापूर्वीची आहे इतकेच..

**गट आणि गण रचनेनंतर आरक्षण जाहीर होताच अनेक जणांनी फिल्डींग लावली होती पण निवडणुका स्थगिती नंतर या इच्छुकांचा अपेक्षाभंग झाला.आरक्षण अपेक्षित न पडल्याने अनेकजणांनी अंग काढून घेतले होते अशानाही आता आशा वाटू लागली आहे.त्यामुळे सगळेच सध्या शांत वाटत असले तरी त्यांचे बारीक लक्ष या प्रक्रियेकडे लागून राहिले आहे.**